वर्मा, भगवत रावत, मणि मधुकर, अशोक वाजपेयी, चंद्रकांत देवताले, विनोदकुमार शुक्ल, राजेश जोशी, अरुण कमल, मंगलेश डबराल, उदयप्रकाश, असद ज़ैदी, आलोक धन्वा, दामोदर मोरे, विजय बहादुर सिंह, ओमप्रकाश वाल्मीकि, कँवल भारती, रमणिका गुप्ता, अनामिका, कात्यायनी, सुशिला टाकभौरे, स्नेहमयी चौधरी, निर्मला पुतुल, रजनी अनुरागी आदि महत्वपूर्ण हैं।

आधुनिक युग के कवियों में नामवर सिंह अति विशिष्ट हैं। नामवर जी ने वर्तमान जीवन की समस्याओं, सामाजिक असंतोश तथा संघर्ष को अत्यंत सहज एवं सटीक भाषा में मार्मिक अभिव्यक्ति दी है। अतः उनकी कविताएँ सामान्य पाठकों को बहुत पसंद आती हैं। प्रसिद्ध आलोचक त्रिलोचन शास्त्री जी के अनुसार, 'नामवरसिंह काल–विचार से ही नहीं अर्थ–विचार से भी आधुनिक कवि हैं।' आज मानव स्वार्थ की स्पर्धा में अंधाधुंद दौड़ रहा है। मानव का स्वार्थ रिश्ते–नाते, घर–परिवार, देश–समाज और इंसानियत से भी ऊपर हो गया है। नामवर जी लिखते हैं–

**'नहीं, नहीं है दुख कि क्यों हुआ मेरा आना**
**ऐसे युग में जिसमें ऐसी ही बही हवा**
**गंध हो गई मानव की मानव को दुस्सह।'**

प्रगतिशील विचारधारा के कवि चंद्रकांत देवताले मुक्तिबोध से बहुत प्रभावित हैं। देवताले जी ने अपनी कविता में रोजमर्रा के जीवन के अनुभवों को गहराई से जानकर उनके भीतर छिपी सच्चाई को विशद किया। उन्होंने आम आदमी के आम किंतु खास जीवन के विविध आयामों को, विभिन्न कोनों को अपनी कविता में प्रकट कर ज़हाँ एक ओर समकालीन जीवन बोध को दर्शाया, वहाँ दूसरी ओर उनमें नीहित मूल्यों की जाँच पड़ताल भी की। 'लकड़बग्घा हँस रहा है', 'रोशनी के मैदान की तरफ', 'दीवारों पर खून से', 'भूखंड तप रहा है' आदि देवताले जी की प्रमुख काव्य रचनाएँ हैं।

देवताले जी की 'यमराज की दिशा' कविता वर्तमान जीवन की हिंसा, अन्याय, अत्याचार को मार्मिक ढ़ंग से अभिव्यक्त करती है। 'यमराज की दिशा' दक्षिण दिशा को कहते हैं, किंतु देवताले जी के अनुसार, अब हर दिशा दक्षिण दिशा हो गई है। यमराज आज हर दिशा में विद्यमान है, चाहे इराक हो, चाहे अफगाणिस्तान, चाहे पॅलेस्टाइन हो, चाहे सीरिया हो, चाहे लीबिया, चाहे कोरिया हो या फिर हमारे अपने देश में गुजरात, असम या मुज़फ्फर नगर हो। आतंकवाद की घटनाओं ने भी देश की आत्मा को ही लहू–लहान कर दिया है। आज हर तरफ मौत का नंगा नाच हो रहा है–

'पर आज जिधर भी पैर करके सोओ
वही दक्षिण दिशा हो जाती है,
सभी दिशाओं में यमराज के आली ान महल हैं,
और वे सभी में एक साथ
अपनी दहकती आँखों सहित विराजते हैं।'

ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त नरेश मेहता जी का वर्तमान युग के कवियों में महत्व अनन्यसाधारण है। उन्होंने आधुनिक कविता को नई व्यंजना के साथ नया आयाम प्रदान किया। 'बन पाखी सुनो', 'बोलने दो चीड़ को', 'संशय की एक रात' मेहता जी की कालजयी काव्य–कृतियाँ हैं। 'संशय की एक रात' मुक्तक छंद में लिखा गया खंडकाव्य है, जिसमें आज के संशयग्रस्त व्यक्तियों का चित्रण है। इस रचना के सभी पात्र – राम, लक्ष्मण, विभीषण और हनुमान – संशय, द्वंद्व और अनिश्चितता से ग्रस्त हैं।

वर्तमान में आम आदमी की पीड़ा को अत्यंत सटीक भाषा में चित्रित करने में राजेश जोशी सिद्धहस्त हैं। 'नेपथ्य में हँसी' उनका चर्चित काव्य संग्रह है, जिसे साहित्य अकादमी पुरस्कार से सम्मानित किया गया है। राजेश जोशी को समझने के लिए उनकी 'मारे जायेंगे' कविता ही पर्याप्त है। कवि के अनुसार, वर्तमान समय की व्यवस्था अत्यंत भ्रष्ट हो चुकी है।

ब्राह्मण्यवादी जड़ मानसिकता ने आज देश के शासन, प्रशासन, कानून एवं न्यायव्यवस्था, मीडिया, राजनीति, शिक्षा व्यवस्था, खेल आदि सब पर अपना कब्ज़ा जमा लिया है और पूरे देश को भीतर–ही–भीतर दीमक की तरह खोखला कर रही है। जो लोग इस व्यवस्था में शामिल नहीं होते हैं, इस व्यवस्था के विरोध में जाते हैं, वे समाप्त कर दिए जाते हैं, चाहे मोहनदास करमचंद गांधी हो, चाहे नरेंद्र दाभोळकर हो, चाहे कॉ. गोविंद पानसरे हो, चाहे कलबुर्गी हो। आज सत्य, ईमानदारी ये शब्द अपराध बन गये हैं। कवि राजेश जोशी के शब्दों में–

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya UMRI Pin-431807 (Maharashtra)

'जो इस पागलपन में शामिल नहीं होंगे, मारे जायेंगे
कटघरे में खड़े कर दिए जायेंगें, जो विरोध में बोलेंगे।
धर्म की ध्वजा उठाये जो नहीं जायेंगे जुलूस में,
गोलियाँ भून डालेगी उन्हें, काफिर करार दिए जायेंगे।'

महाराष्ट्र के हिंदी रचनाकारों में एक नया उभरता नाम है, दामोदर मोरे। मराठी भाषी और मराठी के अध्यापक होकर भी मोरे जी हिंदी साहित्य की सेवा कर रहे हैं। 'सदियों के बहते जख्म', 'नीले शब्दों की छाया में', 'पिछला चक्का', 'पलकें सुलग रही हैं' आदि आपके काव्यसंग्रह प्रकाशित हैं। मोरे जी की कविता में भी जनता का दर्द छलकता है। आम आदमी के भीतर जो विभिन्न समस्याओं एवं प्रश्नों का उबाल हैं, वह हमें मोरे जी की कविता में दृष्टव्य होता है। सामाजिक समस्याओं को कवि ने प्रकृति के प्रतीकों के माध्यम से अभिव्यक्त किया है। उनकी प्रसिद्ध कविता 'ये डरे हुए पेड़' की कुछ पंक्तियाँ इस प्रकार हैं–

'इन्सान के लहू की
क्यों प्यासी बन गई है यह मिट्टी ?
— — — —
पड़ा है अकाल संवेदना का इस भूमि पर
सूख गया है इन्सानियत का झरना इस भूमि पर।'

दलितों का दलितों द्वारा लिखा जा रहा 'दलित साहित्य' वर्तमान हिंदी साहित्य की महत्तम् उपलब्धि है। हज़ारों वर्षों से सभी प्रकार के अधिकारों से वंचित, हाशिए पर जीने वाला दलित आज अपनी दुर्दशा के लिए उत्तरदायी मनुवादी वर्ण–व्यवस्था के विरूद्ध खड़ा है और अपने अधिकारों की माँग कर रहा है। उसका विद्रोह और आक्रोश कभी–कभी सीमोल्लंघन कर जाता है। हिंदी दलित साहित्य लेखन में ओमप्रकाश वाल्मीकि जी को 'मील का पत्थर' कहने में कोई अतिशयोक्ति नहीं होगी। 'सदियों का संताप', 'बस्स! बहुत हो चुका' और 'अब और नहीं' वाल्मीकि जी के प्रकाशित काव्य–संग्रह हैं। वाल्मीकि जी की कविताओं में अतीत के गहरे दंश हैं और वर्तमान की विषमतापूर्ण स्थितियाँ। वे मानवीय मूल्यों के पक्षधर थे और शोशण के घोर विरोधी। उनके 'अब और नहीं' संग्रह की छोटी–सी कविता 'श्रेष्ठ' ब्राह्मणी व्यवस्था से सवाल पूछती है और उनकी जातीय अहंकार से ग्रस्त मानसिकता पर प्रहार करती है–

'ताज्जुब है!
मनुष्य का जन्म तो होता है
सिर्फ माँ के गर्भ से
फिर आप कैसे पैदा हो गए
ब्रह्मा के मुख से?'

Late Babasaheb Deshmukh Gorthekar ... UMRI Pin-431807

हिंदी में आज 'स्त्री–विमर्श' पर बहुत कुछ लिखा जा रहा है। स्त्री–विमर्श साहित्य में स्त्री को पुरुश प्रधान सामंती मनोवृत्ति से अपनी आज़ादी, अपनी अस्मिता, स्वतंत्र अस्तित्व एवं अलग पहचान के लिए चलाया जा रहा आंदोलन है। हिंदी महिला कवियित्रियों में एक उभरता हुआ नाम है, रजनीबाला अनुरागी। अनुरागी जी के एक मात्र कवितासंग्रह 'बिना किसी भूमिका के' ने उन्हें चर्चा के केंद्र में ला खड़ा किया है और अनुरागी जी ने पुरूषसत्ताक व्यवस्था एवं धर्मशास्त्रों को कटघरे में। इनकी कविता में भारतीय नारी की पीड़ा, वेदना, बेचैनी और तिलमिलाहठ एक साथ देखी जा सकती है। वे पुरूश प्रधान व्यवस्था से विनम्र अनुरोध करती हैं–

'अगर पढ़ सको पढ़ों, हमको ही हमारी कविता की तरह,
हम औरतें भी, एक कविता ही तो हैं।'

रजनी जी के अनुसार, औरत घर में हर कहीं बिखरी होती है, तात्पर्य घर के तमाम काम, तमाम ज़िम्मेदारियाँ बखूबी निभाती है और पूरे घर–परिवार को सहेजकर रखती है। औरत परिवार के सुख के लिए अपने सुख का, अपनी ईच्छाओं–आकांक्षाओं का बलिदान कर देती है, किंतु उसका दुर्भाग्य देखिए कि उसका अपना कोई घर नहीं होता, घर तो पुरुश का होता है–

'घर में
हर कहीं बिखरी होती है औरत
लेकिन उसका कोई घर नहीं होता।' ('औरत')

आज हिंदी में आदिवासियों की पीड़ा एवं व्यथा को लेकर भी बहुत कुछ लिखा जा रहा है, विशेषतः आदिवासी रचनाकारों द्वारा, इसे ही 'आदिवासी विमर्श' के नाम से जाना जा रहा है। आदिवासी साहित्य अपनी व्यथा खुद कहने, अपनी समस्याओं के समाधान स्वयं ढूँढने का प्रयास है और प्रस्थापितों द्वारा अपनी संस्कृति को नष्ट करने, संविधान प्रदत्त अधिकारों का हनन तथा अपने संसाधनों जल, ज़मीन, जंगल पर कब्ज़ा जमाने के षडयंत्रों के प्रतिरोध की चेतना से युक्त है। आदिवासी रचनाकारों में रमणिका गुप्ता, हरिराम मीणा, निर्मला पुतुल आदि उल्लेखनीय हैं। हरिराम मीणा लिखते हैं–

'तुफानों ने हमारा कुछ नहीं बिगाड़ा
यहाँ तक कि
भूकम्प और ज्वालामुखी ने भी हमें नहीं उजाड़ा
मगर जिन्होंने हमें गोलियों से भूना वे इंसान थे
जिन्होंने हमें टापुओं के इधर–उधर खदेड़ा वे इंसान हैं
और जो हमारी नस्ल को उजाड़ेंगे वो इंसान होंगे।'

कविता को जनता और उसकी बुनियादी समस्याओं से जोड़ने में तथा उसे अपनी बुलंदियों तक पहुँचाने में लीलाधर जगूड़ी, अशोक वाजपेयी, कैलाश वाजपेयी, अरूण कमल, कुँवर नारायण, भगवत रावत, लीलाधर मंडलोई, विजय बहादुर सिंह, कात्यायिनी, अनामिका, कँवल भारती, सुशीला टाकभौरे, निर्मला पुतुल, स्नेहमयी चौधरी, विमल कुमार, मनोज कुमार झा, महेंद्र भल्ला जैसे कई महिशी कवियों का प्रशंसनीय योगदान रहा है। किंतु प्रत्येक पर लिख पाना न सहज और संभव है और न ही यहाँ उतना अवकाश है।

**निष्कर्षतः** कहा जा सकता है कि समकालीन कवि जनता के, आम आदमी के कवि हैं। वे न किसी वाद से जुड़े हैं, न किसी संप्रदाय से। उनकी प्रतिबद्धता केवल और केवल जन के प्रति, उसकी समस्याओं के प्रति तथा उसके उज्वल एवं सुखी भविष्य के प्रति है। आज साहित्य में नारी विमर्श, दलित विमर्श, आदिवासी विमर्श, अल्पसंख्यक विमर्श, युवा विमर्श, आतंकवाद,

भूमंडलीकरण जैसे विषयों को लेकर भरपूर मात्रा में कविताएँ लिखी जा रही हैं, किंतु इन वर्षों में कोई ऐसी रचना प्रकाश में नहीं आई है, जो युग को नई दिशा प्रदान कर सके।

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya UMRI Pin-431807 (Maharashtra)

संदर्भ ग्रंथ


1) समकालीन हिंदी कविता – विश्वनाथप्रसाद तिवारी।
2) समकालीन हिंदी कविता – सं. चंद्रकांत पाटील।
3) अज्ञेय से अरूण कमल तक – डॉ. संतोश कुमार तिवारी।
4) दस विशिष्ट कवि – सं. विष्णुचंद्र शर्मा।
5) आधुनिक कविता – डॉ. चंद्रकांत पाटील।
6) साहित्य–सरिता – सं. जोगेंद्रसिंह बिसेन।
7) काव्यांजलि – सं. डॉ. अल्लाबक्ष जमादार।
8) उसके सपने : चंद्रकांत देवताले की प्रतिनिधि कविताएँ – सं. विष्णु खरे, चंद्रकांत पाटील।
9) साहित्य भारती – सं. अजय टेंगसे।
10) समृद्ध काव्य – सं. संजय गडपायले।
11) आधुनिक हिंदी काव्य – सं. डॉ. वसंत सुर्वे।
12) आलोचना (त्रैमासिक, सहस्राब्दी अंक उनतालीस, अक्तू–दिस 2010) – सं.अरूण कमल।


Principal
Late. Babasaheb Deshmukh
Gorthekar Arts, Commerce
& Science Mahavidyalaya,
Umri, Dist. Nanded. [M.S.]

भूमंडलीकरण जैसे विषयों को लेकर भरपूर मात्रा में कविताएँ लिखी जा रही हैं, किंतु इन वर्षों में कोई ऐसी रचना प्रकाश में नहीं आई है, जो युग को नई दिशा प्रदान कर सके।

Late Babasaheb Deshmukh Gorthekar * Mahavidyalaya Umri * UMRI Pin-431807 (Maharashtra)

संदर्भ ग्रंथ


1) समकालीन हिंदी कविता – विश्वनाथप्रसाद तिवारी।
2) समकालीन हिंदी कविता – सं. चंद्रकांत पाटील।
3) अज्ञेय से अरूण कमल तक – डॉ. संतोश कुमार तिवारी।
4) दस विशिष्ट कवि – सं. विष्णुचंद्र शर्मा।
5) आधुनिक कविता – डॉ. चंद्रकांत पाटील।
6) साहित्य–सरिता – सं. जोगेंद्रसिंह बिसेन।
7) काव्यांजलि – सं. डॉ. अल्लाबक्ष जमादार।
8) उसके सपने : चंद्रकांत देवताले की प्रतिनिधि कविताएँ – सं. विष्णु खरे, चंद्रकांत पाटील।
9) साहित्य भारती – सं. अजय टेंगसे।
10) समृद्ध काव्य – सं. संजय गडपायले।
11) आधुनिक हिंदी काव्य – सं. डॉ. वसंत सुर्वे।
12) आलोचना (त्रैमासिक, सहस्राब्दी अंक उनतालीस, अक्तू–दिसं 2010) – सं.अरूण कमल।


Principal
Late. Babasaheb Deshmukh
Gorthekar Arts, Commerce
& Science Mahavidyalaya,
Umri, Dist. Nanded. [M.S.]

2.2.1
07

IMPACT FACTOR SJIS 2015 - 5.403

ISSN 2319-4766

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya, Umri Dist. Nanded
UMRI
Pin-431807
(Maharashtra)

# Issues of Farmers' Suicides in India : Past, Present and Future



Editor

Dr. T. V. Munde

Special Issue of an International

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

IMPACT FACTOR SJIF (2015) – 5.403

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya, Umri Dist. Nanded
UMRI
Pin-431807
(Maharashtra)


| | | |
|---|---|---|
| 108 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या<br>*प्रा. देशमुख शंकर भगवानराव & भगवान शंकर* | 389-391 |
| 109 | मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे आणि उपाय<br>*प्रा.मदन शेळके* | 392-396 |
| 110 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय.<br>*प्रा.डॉ.के.एल. जायभाये & प्रा.एन.व्ही. कांबळे* | 397-399 |
| 111 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या - कारणे व उपाय<br>*प्रा.डॉ. माने दिलीप दादाराव* | 400-402 |
| 112 | नविन आर्थिक धोरणाचा भारतीय कृपीव्यवसायावर व शेतकरीवर्गावर झालेला परिणाम (महाराष्ट्र राज्याचे विश्लेषणात्मक अध्ययन)<br>*प्रणया महेंद्र पाटील* | 403-406 |
| 113 | शेतकऱ्यांचे अधिकार आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या<br>*प्रा. डॉ. संभाजी जाधव* | 407-411 |
| 114 | भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत घटक<br>*प्रा.खोकले आर.के.* | 412-415 |
| 115 | भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार घटक<br>*प्रा. डॉ. ए. पी. कुंटे* | 416-419 |
| 116 | मराठवाड्यातील शेतक-यांची सामाजिक, आर्थिक स्थिती<br>*प्रा.डॉ. अरूण के. हांगे* | 420-422 |
| 117 | शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या - तथ्य आणि उपाय<br>*सहा. प्रा. अ. श्री. कौसडीकर* | 423-427 |
| 118 | उमरी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक ज्वलंत प्रश्न<br>*डॉ. डी. डी. कोल्हेकर* | 428-431 |
| 119 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक चिकित्सक अभ्यास<br>*प्रा. शेळके सी.एस. & प्रा. डॉ. मुळे पी.एम.* | 432-436 |
| 120 | भारतातील शेतक-यांच्या आत्महत्येचे वास्तव व उपाय<br>*प्रा.लोढे गणेश पी. & प्रा.डॉ. आर.एम. भालेराव* | 437-438 |
| 121 | मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या (Suicide of Farmers in Marathwada)<br>*Bhande A. P.* | 439-441 |
| 122 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक चितन<br>*डॉ. एल. एच. पाटील* | 442-446 |

११८.

# उमरी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक ज्वलंत प्रश्न

डॉ. डी. डी. कोल्हेकर

*इतिहास विभाग प्रमुख, कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी, जि. नांदेड*

**प्रस्तावना :** शेती हा भारतीय समाजव्यवस्थेचा पुर्वीपार पासून चालत आलेला मुख्य व्यवसाय आहे. भारत हा कृषीप्रधान देश असून जवळपास ७० टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. हा देश खेड्यांनी नटलेला आहे असे म्हणतात. सांगायला आणि ऐकायला चांगले वाटत असले तरी प्रत्यक्षात मात्र ग्रामीण जीवन अनेक समस्यांनी ग्रस्त बनलेले आहे. गरिबी, दारिद्र्य, उपासमार, असुविधा मोठ्या प्रमाणात आहेत. अगदी प्राचीन काळापासून शेती व शेतकऱ्यांची अबालावस्था झालेली आहे. खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या जीवनात आतापर्यंत दैदिप्यमान कृती करण्याचा प्रयत्न कोणीच केलेला नाही. म्हणून त्याच्या जीवनात उदासिनता वाढत गेली. मानवा प्रमाणेच शेतकऱ्यांकडे निसर्गानेही पाठ फिरवली. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी हवालदिल झाला. त्यातूनच त्यांच्या डोक्यात दुष्ट चक्र सुरु झाले आणि स्वतःची जीवनयात्रा संपवण्याच्या स्तरापर्यंत तो जावून पोहोचला.

**उमरी तालुक्याचा अल्पसा परिचय :** नांदेड जिल्ह्यातील उमरी हे तालुक्याचे ठिकाण. तसा उमरीला मोठा इतिहास आहे. हा १९९९ साली नव्याने वसलेला तालुका आहे. मराठवाड्याच्या इतिहासात उमरी ही मोठी बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध आहे. निजामकालीन राजवटीत उमरीस विशेष महत्व होते. एकूण क्षेत्र ४१६८४.४४ हेक्टर,[१] एकूण लोकसंख्या ९९०४१[२], एकूण गावे ६३[३], सिंचनाखालील क्षेत्र कमी, कोरडवाहू क्षेत्र अधिक आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामात उमरीचे मोठे योगदान आहे. शर्मा हे स्वतंत्र सैनिक होते. एकूण स्वातंत्र्य सैनिकांची संख्या ११ आहे. उमरीची बॅक लुट प्रकरण इतिहासात प्रसिद्ध आहे.[४] त्यामुळे अजूनही उमरीत स्टेट बँक ऑफ हैद्राबादची शाखा मिळत नाही. उमरी या तालुक्याला मुदखेडमार्गे नांदेडला जोडण्यात आले आहे तसेच भोकर, धर्माबाद व नांयगाव या तालुक्यांना जोडण्यात आलेले आहे. तालुक्या अंतर्गत रस्ते पक्के व कांही कच्च्या स्वरुपातच आहेत. चांगला रस्ता हे विकासाचे महत्वाचे लक्षण आहे परंतू ते येथे नाही म्हणून या ग्लोबल जगात उमरीचे स्थान शुन्य आहे.

**शेतीचे प्रकार :** तालुक्यातजीरायती व बागायती शेती आहे. मोठ्या प्रमाणात कोरडवाहू क्षेत्र आहे. शेती निसर्गावर अवलंबून आहे. मध्यम स्वरुपाची जमीन असल्यामुळे जास्तही व कमीही पाऊस चालत नाही. चांगले पीक पाणी आले म्हणून विचारले तर बोटावर मोजता येतील एवढीच वर्षे सांगता येतील.

**उपलब्ध रोजगार :** लोकसंख्येच्या प्रमाणात जमीन उपलब्ध नाही. जशी लोकसंख्या वाढली तसे शेतीचे विभाजन झाले प्रत्येक कुटूंब एक ते दोन एकर पर्यंत येऊन ठेपले आहेत. म्हणून प्रत्येकाला मजूरी केल्याशिवाय पर्याय नाही. तालुक्यात लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार उपलब्ध नाहीत. तालुक्यात छोटे मोठे उद्योगही नाहीत. त्यामुळे बेकारी, दारिद्र्य वाढीस लागले आहे. तालुक्यात साखर कारखाना आहे. तो पण कधी चालू तर कधी बंद असतो. म्हणून नवतरुण शहराकडे वळला आहे. पुणे, मुंबई, औरंगाबाद, बेंगलोर अशा शहरात कामाला गेलेला आहे. शेतमजूरी, पशुपालन हेच मुख्य रोजगार आहेत.

**निसर्गाचा लहरीपणा :** तालुक्यातील शेती प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून आहे. विहीरी, बोअरवेल व उर्ध्व पैनगंगा कालवा यावर मोजकेच क्षेत्र पाण्याखाली येते. उर्वरीत क्षेत्र पावसाच्या पाण्यावरच आधारलेले आहे. कधी जास्त तर कधी कमी पाऊस तर कधी नाममात्र पाऊस या निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी हवालदिल बनला आहे. शेती व्यवसायात त्याला नैराश्य येत आहे.

**शेतकऱ्यांची उदासिनता :** निसर्गाच्या लहरीपणामूळे व काढलेल्या कर्जामूळे शेतकरी दिवसेंदिवस निराश बनत चाललाय. मागील पाच वर्षापासून आपण बघतो आहोत की साधी खरीप पिके सूद्धा पाण्याच्या अभावाने करपून गेली. पाण्यासाठी आकाशाकडे टक लावून बसलेला शेतकरी जागीच थकून गेला. निसर्गालाही त्याची किव आली

…ही मग कर्ज देणाऱ्या सावकाराला शेतकरी कर्जाच्या डोंगरात बूडत गेला. त्याच्या मनात अनेक प्रश्नाचे थैमान सुरु झाले. नैराश्य, उदासिनता निर्माण झाली. गोंधळलेला शेतकरी आपली जीवन यात्रा संपवण्याच्या विचारात पडता.

**आत्महत्या करण्यापर्यंतजाऊन पोहचण्याची कारणे :** या पृथ्वीवरील प्रत्येक गोष्ट एकाएकी किंवा अचानक निर्माण झालेली नाही. तर त्यासाठी अनेक कारणे जबाबदार आहेत. त्याप्रमाणे शेतकरीसुद्धा एखाद्या कारणामुळे आत्महत्या करीत नाहीत तर त्यासाठी अनेक कारणे जबाबदार आहेत. ही कारणे अत्यंत महत्वपूर्ण व ज्वलंत आहेत. ते दूर करणे अत्यंत महत्वाचे आहे. त्या अनूषंगाने कधी उपाययोजना केल्या गेल्या तर शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या नक्कीच थांबतील असे वाटते.

१) **खुल्या अर्थव्यवस्थेचा स्विकार :** भारताने खुल्या अर्थव्यवस्थेचा स्विकार केला है देशाच्या विकासासाठी चांगले आहे. परंतू ही व्यवस्था शेतकऱ्यांच्या उत्पादकतेशी निगडीत नाही हे शासनाच्या लक्षात केंव्हाच आलेले नाही. सामान्य शेतकरी अनेक समस्या व असुविधेमूळे जागतिक स्पर्धेमध्ये टिकू शकत नाही. शेतीमालावर प्रक्रिया करणारे देशात किती उद्योग आहेत आणि ते शेतकऱ्यांच्या मालकीचे आहेत का याचे उत्तर नाही हेच सांगावे लागेल मग अशा अर्थव्यवस्थेच्या शेतकऱ्यांला काय उपयोग आहे. खेडेगावात आता एकही कुटीरोद्योग नाही स्वयंपूर्ण खेड्याची संकल्पना आता कालबाह्य बनली आहे.

२) **झपाट्याने वाढणारी लोकसंख्या :**

आज आपण चीनलाही मागे टाकलेले आहे. जगात भारत हा लोकसंख्येच्या बाबतीत पहिल्या क्रमांकाचा देश आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन द्यावयाला चीन यशस्वी ठरला परंतू यात भारताला यश आले नाही. भारत सरकारलाही लोकसंख्या वाढीवर कोणत्याही प्रकारचे नियोजन करता आलेले नाही. शेतकऱ्यांच्या जीवनात अठराविश्व दारिद्र्य आणि त्यात भर म्हणजे लोकसंख्या वाढ कमावणारे हात चार आणि खाणारी तोंडे दहा अशी अवस्था आहे. त्यात शेतकरी नापीकीमुळे कर्जबाजारी होतो. यासंदर्भात कडक कायदा करण्याची आज गरज आहे तसे चीन मध्ये आहे.

३) **कर्जबाजारीपणा :**बहुतांश शेतकऱ्यांचा जन्म हा डोक्यावर कर्ज घेऊन झाल्याचे स्पष्ट दिसते. मुलगा जन्माला आला तेंव्हा वडील कर्जबाजारी. आपल्या मुलांना जन्म देतांना स्वत: कर्जबाजारी कर्जात जन्माला येतो वाढतो आणि कर्ज डोक्यावर घेवून मरतो. म्हणून शासनाने एखादी तरी ठोस योजना शेतकऱ्यांसाठी राबवावी. कर्जबाजारी पणामूळे शेतकरी निराश होतो आणि शेवटी तो आत्महत्येस प्रवृत्त होतो.

४) **शासन आणि प्रशासनात सुसंगतपणा नाही :**भारतीय शासन आणि प्रशासनात सुसंगतपणा नाही हे स्पष्टपणे जाणवते. मोठमोठी आश्वासने देऊन राजकारणी मोकळे होतात निवडूण आल्यावर त्याची पूर्तता करतात का? एखादी योजना शेतकऱ्यांपर्यंत खरीच पोहचली का? याचा पाठपूरावा केला जातो का? तर याचे उत्तर नाही असेच म्हणावे लागेल. कारण भ्रष्टाचाराने बरबटलेल्या या प्रशासन व्यवस्थेत शेतकरी खेटे मारुन मारुनच थकून जातो. त्या योजना कागदोपत्री तिसराच खाऊन मोकळा होतो. कर्ज मात्र शेतकऱ्यांच्या सात अ बारावर राहते. मग असे असेल तर शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय? शासनाची योजना चांगली असेल पण ती योजना गरजूच्या दारापर्यंत पोहचवणे प्रशासनाचे काम आहे.

५) **शेतकऱ्यांचा अज्ञानीपणा :**सर्वात महत्वाचे मूळ कारण म्हणजे शेतकऱ्याचा अज्ञानीपणा आहे. हजारो वर्षापासून शेतकऱ्यांने आपल्या अंर्तमनाला प्रश्न विचारला नाही की हे माझे एवढे हाल कशामुळे होतात. या विषयी गांर्भीयाने विचार करणारा व्यक्ती म्हणजे म. फुले होय. कदाचित म. फुल्यांनी बळीराजाच्या नंतर जन्म घेतला असता तर शेतकरी ज्ञानी बनून सुखी झाला असता मात्र तसे झाले नाही. रुळलेल्याच वाटेणे जाणे शेतकऱ्यांने पसंद केले म्हणून तो निरक्षर राहिला. अज्ञानामूळे शेतकऱ्याचा विकास खुंटला त्यामूळे त्याच्या वाट्याला दारिद्र्य, गरीबी, उपासमार अशा अनेक समस्या आल्या. महाशक्ती बनू पाहणाऱ्या भारतातील शेतकऱ्याची अशी अवस्था असेल तर कोणती महाशक्ती असाच प्रश्न पडतो. इमारत बांधावयाची असेल तर आपण हजारवेळा पाया मजबूत बनला पाहिजे याची काळजी घेतो मग ७० टक्के लोक शेतकरी असतील तर तो आपल्या देशाचा पाया आहे. आणि तोच

Umri Dist. Nanded, UMRI Pin-431807 (Maharashtra)

जर कच्चा राहिला तर देशाचे काय? कसा महाशक्ती बनणार देश मोठ मोठ्या उद्योगावर मोठ मोठ्या मग शेती व शेतकऱ्यांवर खर्च करायला सरकारचे हात का थरथरतात याचा विचार केला पाहिजे. कृषी शेतकऱ्यांना परवडणारे नवे तंत्रज्ञान, सिंचन व्यवस्था, नाममात्र व्याजदारची कर्जे, शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण सोयी सवलती, विशेष करुन कृषी उपयोगी शिक्षण त्यांना द्यावे. डॉक्टरचा मुलगा डॉक्टर मग शेतकऱ्यांचा मुलगा शेतकरी हे सुत्र डावलून शेतकऱ्यांचा मुलगा कधी डॉक्टर होईल याचाही विचार शासनाने करायला पाहिजे.

५) **झपाटयाने वाढणारी शहरे** :झपाटयाने वाढणाऱ्या शहरीकरणाचा फार मोठा परिणाम कृषी क्षेत्रावर झालेला आहे. शेती व्यवसाय एकट्या शेतकऱ्यांचा नव्हे तर त्यासाठी फार मोठे मनुष्यबळ लागते. सद्यस्थिती पाहिली तर शेतमजूर कमी झालेले आहेत. नव्या पिढीला शेतावर काम नकोसे वाटायला लागले आहे. शहरात मिळणारा कोणताही व्यवसाय करायला ते तयार झालेले आहेत मग शेती करायची कोणी असा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतात एखादे पिक चांगले आले खरे पण ते काढायचे कसे असा शेतकऱ्यांसमोर प्रश्न निर्माण झालेला आहे. म. गांधीचीसंकल्पना खोटी ठरत आहे. खेड्याकडे चला ऐवजी उलट शहराकडे चला असा सूर ग्रामीण भागात निघत आहे. खेड्यातून लोंढेच्या लोंढे शहराकडे येत आहेत त्यामुळे शहरीकरण वाढत चालले तर दुसरीकडे शेती ओस पडण्याच्या मार्गावर आहे. हे कुठेतरी थांबले पाहिजे.

६) **इतर कारणे** :याशिवाय अनेक कारणे कारणीभूत आहेत. जसे सामाजिक विषमता, आर्थिक नैराश्य, दुष्काळजन्य परिस्थिती उत्पादन क्षमतेवर मोठा परिणाम, शिक्षणाचा अभाव, ऐतखाऊ प्रवृत्ती, बेकारी, शेतीमालाला कवडीमोल भाव इत्यादी. आत्महत्या हा वैयक्तिक, विघटनाचा प्रकार आहे व्यक्ती जेंव्हा स्वतःच्या समस्या सोडविण्यासाठी असफल होतो तेंव्हा तो आत्महत्या करतो. म्हणजेच नैराश्य येते यातून सुटका करण्याचा त्याला एकच मार्ग दिसतो तो म्हणजे आत्महत्या.

**उपाय योजना** :शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी सर्वच स्तरातून प्रयत्न झाला पाहिजे. देशात खूप मोठे मोठे दानशूर आहेत त्यांनी आपल्या सदसद विवेकबूद्धीचा वापर करुन आपला पोशिंदा शेतकरी याला कांही देता आले तर दिले पाहिजे. तमाम माझ्या देशवासियांना मला सांगावयाचे आहे की, माझ्या भोळ्या, भाभड्या, अज्ञानी अनपड शेतकऱ्याला शेतकरीच म्हणा शेतकरी राजा म्हणून त्याची अवहेलना करु नका. तो कशाचा राजा आहे. डोक्यावर फाटलेले छप्पर, अंगावरच गाठी मारलेले धोतर, फाटलेला सदरा यातच तो बेजार असतो तो कसला राजा. ज्ञानवंतांनो तो जर तुम्हाला राजा वाटत असेत तर तुम्ही सुटाबुटातले कोण आहात याचा विचार करा. शासनाला माझा एक प्रश्न आहे मोठ मोठ्या उद्योगपतींचे कर्ज तुम्हाला माफ करता येतात. बुडणारा एखादा उद्योग तुम्हाला पुन्हा पुर्नरुज्जीवीत करता येतो मग तुम्हाला जगवणाऱ्या बापाच कर्ज का माफ करता येत नाही. शेतकऱ्याला पुन्हा पुर्नरुज्जीवीत का करता येत नाही. जगा जगू द्या म्हणणारी संस्कृती, माझ्यासाठी नाही तर तुझ्यासाठी म्हणणारी आमची संस्कृती कुठे आहे. मुलानेच बापाला डावले तर वारस काय कामाचा. असो कर्ज माफ करता आले नाही तरी चालेल परंतु माझा शेतकरी कर्जबाजारी होणार नाही यांची तरी खबरदारी घ्या. ठोस योजना त्याच्या दारापर्यत पोहचतील याची काळजी घ्या. शासनाने व प्रशासन कर्त्यांने शेती व शेतकरी कसा सुधारेल याची काळजी घ्यावी. दुसरी गोष्ट शेतकऱ्यांच्या जीवाची किंमत एक लाख रुपये होऊ शकत नाही. तेंव्हा त्याच्या परिणामांचाही विचार व्हावा. त्या कुटूंबावर कोसळलेल्या संकटाचा प्रतिकार करणारी त्या कुटूंबाला शक्ती द्या. लाख रुपयाने कांहीच होत नाही. गरिबी, बेकारी, दारिद्र्य हटाव म्हणून मोहिम काढून चालत नाही तर कृतीची आज गरज आहे. कांही वर्षे बिनव्याजी कर्जपूरवठा करता येईल का याचा विचार व्हावा. शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेत वाढ होण्यासाठी शुन्य खर्चाची शेती करण्यावर भर देता येईल का? याचाही विचार व्हावा. अशा अनेक प्रकारच्या उपाय योजनांचा विचार करता येईल. मी अल्पसा येथे विचार केलेला आहे. शेतीमालाला योग्य व हमी भाव देण्यात यावा. सिंचनासाठी मोठा खर्च करण्यात यावा.

**उमरी तालुक्यातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या** : मी या ठिकाणी शोध निबंधाच्या अनुषंगाने सन २०१४ ते २०१६ या तिन वर्षातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांचा संदर्भ घेतलेला आहे. हा संदर्भ छोटा असला तरी आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कारणापर्यंत जावून शोध घेण्यासाठीचा हा एक मार्ग आहे. प्रत्येक शेतकऱ्यांच्या

आत्महत्येच्या मुळाशी वरिल कारणे जबाबदार आहेत हे आपणाला स्पष्टपणे जाणवते. या शोध निबंधासाठी प्रत्यक्ष कुटूंबातील कांही व्यक्तींच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. ते प्रत्यक्ष व प्रथम दर्जाचे साधन आहे. या तिन वर्षाच्या काळात जवळपास १२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. हा अहवाल तहसिल कार्यालयानुसार आहे. प्रत्यक्ष कुटूंबाची संवाद साधला असता त्यांच्या कुटूंबाची अवस्था अत्यंत अवघड आहे. कोसळलेल्या दुःखाच्या डोंगरातून ही कुटूंबे आजही सावरलेली नाहीत. त्यांचे जीवन अर्ध्यावरच दिसते आहे. गंगाधर पुंडलिक जाधव, बळेगांव, दिगांबर आनसाजी भूजबळे, हिरडगांव, गोवर्धन बालाजी ढगे, अब्दूलापूरवाडी, प्रकाश ईरबा जाधव, एंडाळा, पुंडलिक व्यंकटी मंथलवाड बितनाळ, आनंदा गोविंदा शिंदे बोळसा, चक्रधर गंगाधर सावंत तुराटी, बाबू नारायण हुलगुंडे वाघाळा, व्यंकटी हनमंत देवकर मोखंडी, प्रकाश शिवनाजी निकलपूरे सोमठाणा, बळीराम घडलिंग पवळे पळसगांव, बंशी झंपू राठोड बोळसा या सर्व शेतकऱ्यांनी आत्महत्या करुन आपले जीवन संपवले. या सर्वांना शासनाने सहानुग्रहानूदान दिले खरे परंतू या कुटूंबाना समर्थपणे पुन्हा उभारी घेण्याचे काय सामर्थ्य दिले याचा विचार कोण करणार त्याचे जीवन वाऱ्यावरच का? होणाऱ्या आत्महत्या रोखण्यासाठी काय उपाय योजना आखल्या का? प्रबोधन केले का? असे प्रश्न कोणाला विचारावे व त्यांचे उत्तर कोणी द्यावे हा एक गंभीर प्रश्न बनला आहे. म्हणून या शोध निबंधाच्या माध्यमातून मी थोडासा उमरी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न किती लोकांना रुचेल पचेल माहित नाही पण यातील एकही बाब वा एका समस्येचे निराकरण केले तरी खूप झाले.

निष्कर्ष : आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचा ज्वलंत प्रश्न हा उमरी तालुक्या पूरताच मर्यादीत नाही तर भारत सरकार समोरील एक मोठी समस्या आहे. हे थांबविण्यासाठी तुमची आमची गरज आहे . आता करणे शोधत बसण्यापेक्षा ठोस उपाय योजना राबविण्याची नितांत गरज आहे. हा माझा शोध निबंध त्यांच्यासाठी थोडाका होईना उपयोगी यावा हाच हेतू. प्रत्यक्ष मुलाखतीतून शेतकरी कुटूंबाची दयनिय अवस्था गरिबी, दारिद्रय, नैराश्याची भावना दूर करता आली पाहिजे. पुन्हा एकदा त्या मुलांच्या जीवनात आनंद देता आला पाहिजे. आणि इथून पूढे शेतकरी तसा मनात विचार आणनार नाही तशी तरतूद केली पाहिजे. येथेच मी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजली वाहतो आणि माझ्या शेतकरी बांधवांना आव्हान करतो की, जगण्याची जिद्द उरी बाळगा. मुला बाळांना उघडयावर सोडून जाण्याचा विचार मनात सुद्धा आणू नका. तुम्ही जगा व इतरांना खूप खूप जगायला शिकवा. तुम्ही अनपड, अज्ञानी असलात तरी चालेल पण आपल्या मुलांना शिकवा व जीवन जगण्याचा नवा मार्ग दाखवा. उद्या तुमचे सर्व कुटूंब तो, ती सुंदर बनवेल मी पण तुमच्यातील एक होतो शिक्षणाने मी सुंदर बनलो. माझे कुटूंब आनंदी बनले म्हणून शिक्षण हे संघर्षाचे साधन आहे. जगण्याचा मार्ग आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरील उत्तम एक उपाय आहे.

## संदर्भ सूची


*तहसिल कार्यालयाचा अहवाल.*
*कित्ता.*
*कित्ता.*
*तहसिल कार्यालय उमरीतील प्रत्यक्ष नोंद*
*डॉ. अनिल कठारे, आधुनिक भारताचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड*
*आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटूंबातील सदस्यांची प्रत्यक्ष मुलाखत*
*दै. सकाळ*
*दै. लोकमत*
*महाराष्ट्र टाईम्स*
*लोकसत्ता*
*Dr. Balaji Kamble, Interlink Research Analysis, June 2011, Jyatichadra Printing & Binding Pvt, Ltd. Latur.*


Principal
Late Babasaheb Deshmukh
Gorthekar Arts, Commerce
& Science Mahavidyalaya,
Umri, Dist. Nanded. [M.S.]

SRJIS

Pathri Taluka Shikshan Prasarak Mandal's

**KATRUWAR ARTS, RATANLAL KABRA SCIENCE &**
**B. R. MANTRI COMMERCE COLLEGE,**

Manwath – 431 505 Dist. Parbhani

*(NAAC Reaccredited 'B' Grade with 2.65 CGPA)*

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya, Umri Dist Nanded
UMRI
Pin-431807
(Maharashtra)

University Grants Commission, WRO, Pune Sponsored

Two Days National Seminar

ON 21 & 22 APRIL, 2017

# Issues of Farmers' Suicides in India: Past, Present and Future

Special Issue of an International

## SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

IMPACT FACTOR SJIF (2015) – 5.403

Chief Editor

Principal Dr. A. B. Chindurwar

Editor

Dr. T. V. Munde

Editorial Board

Dr. K. B. Patole

Dr. S. K. Shinde

Dr. Sharda Raut

Dr. P. S. Landage

Sunita Kukade

V. P. Jadhav

Dr. C. P. Vyas

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya, Umri Dist. Nanded * UMRI Pin-431807 (Maharashtra) *

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्राध्यापकाचे नाव व पेपरचे शीर्षक | पान. क्र. |
|---|---|---|
| 79 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक अभ्यास<br>*डॉ. बी. डी. इंगळे* | 277-280 |
| 80 | भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या: एक अर्थशास्त्रीय अभ्यास<br>*डॉ. अनिल दि.वाडकर* | 281-285 |
| 81 | भारतीय शेतकऱ्याच्या आत्महत्येस जबाबदार घटक<br>*प्रा. कविता प्रल्हादराव हिरुळकर* | 286-290 |
| 82 | शेतकरी आत्महत्या कारणे व उपाय : वाशिम जिल्ह्याच्या संदर्भात एक अध्ययन<br>*डॉ. एच. आर. तिवारी* | 291-295 |
| 83 | भारतातील भोतकऱ्याच्या आत्महत्येची वर्तमान,भुत व भविष्यातील समस्या<br>*प्रो.डॉ.अवथरे जयेश मो.* | 296-300 |
| 84 | विदर्भातील जलसिंचनाची स्थिती आणि अडचणी<br>*माधव चोले* | 301-304 |
| 85 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यास्थितीचे अध्ययन<br>*डॉ. वन्ने मोहन भूजंगा* | 305-307 |
| 86 | भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येची कारणे व उपाययोजना - एक अभ्यास<br>*प्रा. डॉ. मारोती विठ्ठलराव भोसले* | 308-313 |
| 87 | मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या :आत्महत्या कारणे व उपाय<br>*Dr. Ashok P. Tiparse* | 314-318 |
| 88 | भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार असणाऱ्या घटकांचा अभ्यास<br>*प्राचार्य डॉ. व्ही. एच. नागरे* | 319-321 |
| 89 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या-समाजशास्त्रीय अध्ययन<br>*प्रा. डॉ. चव्हाण एस.जी.* | 322-323 |
| 90 | भारतातील शेतकऱ्यांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना<br>*डॉ. तुकाराम वैजनाथराव पोवळे* | 324-328 |
| 91 | ग्रामीण अर्थव्यवस्था : कृषी उत्पादकता आणि शेतकऱ्याच्या आत्महत्या<br>*प्रा. डॉ. एम. डी. कच्छवे* | 329-333 |

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya, Umri Dist Nanded
UMRI
Pin-431807
(Maharashtra)


| | | |
|---|---|---|
| 108 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या<br>*प्रा. देशमुख शंकर भगवानराव & भगवान शंकर* | 389-391 |
| 109 | मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे आणि उपाय<br>*प्रा.मदन शेळके* | 392-396 |
| 110 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय.<br>*प्रा.डॉ.के.एल. जायभाये & प्रा.एन.व्ही. कांबळे* | 397-399 |
| 111 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या - कारणे व उपाय<br>*प्रा.डॉ. माने दिलीप दादाराव* | 400-402 |
| 112 | नविन आर्थिक धोरणाचा भारतीय कृषीव्यवसायावर व शेतकरीवर्गावर झालेला परिणाम (महाराष्ट्र राज्याचे विश्लेषणात्मक अध्ययन)<br>*प्रणया महेंद्र पाटील* | 403-406 |
| 113 | शेतकऱ्यांचे अधिकार आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या<br>*प्रा. डॉ. संभाजी जाधव* | 407-411 |
| 114 | भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत घटक<br>*प्रा.खोकले आर.के.* | 412-415 |
| 115 | भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार घटक<br>*प्रा. डॉ. ए. पी. कुंटे* | 416-419 |
| 116 | मराठवाड्यातील शेतक-यांची सामाजिक, आर्थिक स्थिती<br>*प्रा.डॉ. अरूण के. हांगे* | 420-422 |
| 117 | शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या - तथ्य आणि उपाय<br>*सहा. प्रा. अ. श्री. कौसडीकर* | 423-427 |
| 118 | उमरी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक ज्वलंत प्रश्न<br>*डॉ. डी. डी. कोल्हेकर* | 428-431 |
| 119 | महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक चिकित्सक अभ्यास<br>*प्रा. शेळके सी.एस. & प्रा. डॉ. मुळे पी.एम.* | 432-436 |
| 120 | भारतातील शेतक-यांच्या आत्महत्येचे वास्तव व उपाय<br>*प्रा.लोढे गणेश पी. & प्रा.डॉ. आर.एम. भालेराव* | 437-438 |
| 121 | मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या (Suicide of Farmers in Marathwada)<br>*Bhande A. P.* | 439-441 |
| 122 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक चिंतन<br>*डॉ. एल. एच. पाटील* | 442-446 |

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya, Umri Dist. Nanded UMRI Pin-431807 (Maharashtra)

११३.

# शेतकऱ्यांचे अधिकार आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या

**प्रा. डॉ. संभाजी जाधव**

*मराठी विभाग प्रमुख, कै. बाबसाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी जि. नांदेड*

आजच्या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा शेतीप्रधान समाजव्यवस्थेतील एक ठळक आणि गंभीर सामाजिक प्रश्न निर्माण झाला आहे.भारतासारख्या शेतीप्रधान देशामध्ये शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या अधिक असल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारखा प्रश्न निर्माण व्हावा ही गंभीर बाब आहे. त्याहीपेक्षा अधिक गंभीर काय असेल तर या प्रश्नाकडे शासन आणि इतर जबाबदार घटक म्हणावे तितके गांभीर्याने लक्ष देत नाहीत. सर्वच राजकीय पक्ष आपल्या अस्तित्वासाठी, निवडणुकीच्या जाहिरनाम्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या या समस्येचा समावेश करतात निवडणूक संपली की, त्याकडे दुर्लक्ष केले जाते, हे अत्यंत धोकादायक आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही समस्या आज अनेकांच्या अभ्यासाचा विषय आहे. पण भारतातील केंद्र व राज्य सरकारे हया प्रश्नाकडे मामुली प्रश्न म्हणून पाहत आहेत. आणि नैमित्तिक उपाय म्हणून समित्या नेमणे अहवाल तयार करणे, ते बासनात टाकणे आणि तात्पुरती मदत म्हणून पॅकेज देणे हे उपाय करत आहेत......हे प्रश्न खोलवर गेलेले आहेत आणि त्यांचा अंतिम परिणाम म्हणजे आत्महत्या होत आहेत, हे मान्य केले जात नाही.[1] शासन अशा पध्दतीने या प्रश्नाकडे पाहते, तर दुसऱ्या बाजुला बुध्दीवादी वर्ग त्याकडे खुप गंभीरतेने पाहतो आहे. या समस्येच्या मुळाशी जाण्यासाठी अनेक विचार मांडले जात आहेत. त्यामध्ये शेतकऱ्यांचे अधिकार डावलले जाणे हा घटक जबाबदार आहे, हे आढळून आले आहे. अधिकार डावलले जाण्याणे कांही आत्महत्या होतात का? ही समस्या घेवून मी शोधनिबंध करण्याचे निश्चित केले.

मानवी अधिकार ही संकल्पना निसर्ग नियमाला धरुन आहे. व्यक्तीला जीवन जगताना असे कांही अधिकार आवश्यक असतात. जेंव्हा नैसर्गिक अधिकार कोणत्याही व्यक्तिकडून, समुहाकडूंन, किंवा शासनाकडून डावलले जातात तेंव्हा व्यक्तीच्या जीवनात नैराश्य येत असते. त्याचप्रमाणे शेतकऱ्याला एक शेतकरी म्हणून पारंपरिक पध्दतीमध्ये राज्यघटनेत कांही अधिकार दिले आहेत. त्यामुळे शेतीला आणि शेतकऱ्यांना सुरक्षितात मिळत असते. अशी सुरक्षितता मिळणे हे समाज आणि राष्ट्राच्या हिताचे असेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांना बियाने, पैसा पेरणीच्या काळात पुरविला आहे हे सर्वज्ञात आहे. असे अनेक उदाहरणे इतिहासात सापडतात. कर्जपुरवठा, शेतीमालाला भाव, पिकविमा या माध्यमातून शेकऱ्यांना सुरक्षितता दिली जाते. आपल्याही देशात अशा पध्दतीची सुरक्षितता शासन यंत्रणा देत असते. पण ती कितपत शेतकऱ्यापर्यंत पोहचते हा कळीचा मुद्दा आहे.

सहाकारी संस्था मधील उत्पादन व नफ्यामध्ये सहभागी होण्याचा अधिकार शेतकऱ्यांना दिला आहे. साखरकारखाने, सुतगिरण्या, मार्केट कमिटी, दुध डेअरी या सर्वाच्या नफ्यामध्ये हिस्सा मागण्याचा अधिकार शेतकऱ्यांना दिला आहे. पण अशा सर्व सहकारी संस्था तिथे कार्यरत असलेले संचालक मंडळ तोटयात दाखवितात. त्यामुळे नफ्यात हिस्सा मागण्याचा केवळ कागदोपत्री अधिकार शेतकऱ्यांला देवून काय उपयोग आहे. राजयकर्ते शेतकऱ्यांचा हा अधिकार अशा पध्दतीने डावलतात.

माहिती मिळविण्याचा व तक्रार करण्याचा अधिकार शेतकऱ्यांना दिला आहे. बाजारातील बियाणे, किटकनाशके, खते अनेकदा भेसळयुक्त विकले जातात किंवा कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते. त्यामुळे अशा बियाण्या बाबत माहिती मागण्याचा, नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार शेतकऱ्यांना आहे. पण त्यात अनेक अटी टाकलेल्या असतात. जरी हा अधिकार वापरला तरी शासन दरबारी अशा व्यापाऱ्यांविरोधात कांहीच कार्यवाही होत नाही. त्यामुळे हा अधिकार असून नसल्यासारखा आहे.

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya UMRI Pin-431807 (Maharashtra)

बँक, सहकारी संस्था यांच्याकडून कर्ज घेण्याचा अधिकार शेतकऱ्यांना दिला आहे. राष्ट्रीयकृत बँक शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करीत असते. पण तो कर्जपुरवठा अल्पप्रमाणात असतो वेळेत दिला जात नाही. दलालामार्फत भ्रष्टाचार होतो. पुनर्गठणच्या नावाखाली नवीन कर्जपुरवठ्यातून कपातकेली जाते व शेतकऱ्यांच्या हातात फारच कमी भांडवल रुपाने पैसा येतो. त्या अपुऱ्या भांडवलात बियाणे, खते, किटकनाशके खरेदी करणे अशक्य असते, तेव्हा शेतकरी सावकाराकडे कर्ज घेण्यासाठी वळतो. इथे एक महत्त्वपुर्ण मुद्दा राजू शेट्टी मांडतात, राष्ट्रीयकृत बँकेत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी परतफेडीची क्षमता न तपासताच कॉर्पोरेट सेक्टरला लाच घेऊन लाखो कोटीची कर्जे 'राइट ऑफ' करावी लागली म्हणजे त्यावर पाणी सोडावे लागले. याच बँकाचा तोटा कमी करण्यासाठी केंद्रसरकारला गेल्या वर्षी ३० हजार कोटी, तर या वर्षी १० हजार कोटीची तरतूद करवी लागली. तरीही बँका अजून अडचणीत आहेत. दुसरीकडे निम्म्यापेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांची थकीत कर्जे एक लाख कोटी रुपयांपेक्षा कमी आहेत. तरीही स्टेट बँकेच्या अध्यक्षा अरुंधती भट्टाचार्यांना असे वाटते की, शेतकऱ्यांचे फार लाड होत आहेत.[२] अशी शेतकरी आणि कारखानदार यांना वेगळ्या प्रकारची वागणूक राष्ट्रीयकृत बँकेत मिळते. त्यामुळे शेतकरी नाइलाजास्तव मॉयक्रोफॉयनान्सकडे वळतो आहे. अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्याची कथा यावर जळजळीत प्रकाश टाकणारी आहे. खानापूर (मेंढी) या गावात शिवहरी वामनराव ढोक हा दोन एकर कोरडवाहू जमीन असणारा शेतकरी पहिल्यांदा सेवा सोसायटीच्या माध्यमातून जिल्हा बँकेचे दिड लाख रुपये कर्ज काढले. त्याचे हप्ते आणि व्याज भरण्यासाठी वरुड अर्बन बॅकेचे अडीच लाखांचे कर्ज काढले. अवकाळी पावसामूळे घराची पडझड झाली म्हणून दुरुस्तीसाठी महिंद्रा फायनान्स कंपनीचे सव्वा लाख रुपये कर्ज काढले. दोन तीन वर्षात त्याच्यावर पाच लाखाचे कर्ज झाले. व्याजाची रक्कम भरता भता दमछाकहोऊ लागली. दोन एकर कोरडवाहू शेतीतील उत्पन्न आणि नवरा बायकोने केलेली मोलमजूरी यांची तोंड मिळवणी...... कशाचा मेळ कशाला लागेना. मग एल. टी. फायनान्सकडून १५ हजार रुपये कर्ज काढले. मोलमुरी करुन मिळणारा सारा पैसा या फायनान्स कंपनीकडेच चालला, म्हणून पुन्हा एचडी. एफसी. बँकेचे पुन्हा १७ हजार रुपयांचे कर्ज काढले. हे कमी होते म्हणून एस. के. फायनान्स या केपनीचे पुन्हा २० हजार रुपयांचे कर्ज. एका बाजुला या फायनान्स कंपन्या वसुलीसाठी शिवहरीच्या मागे लागल्या. तो जिथे काम करेल त्या ठिकाणी जाऊन वसुलीचा तगादा लावू लागले. तेथुनही गायब झाला म्हणून कंपन्यांचे प्रतिनिधी रात्री अपरात्री घरी येऊ लागले. घरात....... शिकणाऱ्या तीन मुली, त्याच्यासमोर अर्वाच्य भाषेत बोलणे, हे सर्व असह्य झाल्याने एक दिवस शिवहरीने आत्महत्या करुन आपले जीवन संपविले.[३] शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकेतून कर्ज घेण्याचा अधिकार असूनही भ्रष्ट प्रशासनपामूळे त्याचा हा अधिकार पुर्ण पणे वापरु दिला नाही. म्हणून त्यांना मॉयक्रोफॉयनान्स सारख्या क्षेत्राकडे वळावे लागले. त्यांच्याशी कॉर्पोरेट क्षेत्राप्रमाणे पत करुन कर्ज पुरवठा केला नाही. त्यामूळे तो कर्जाच्या विळख्यात सापडत गेला आणि शेवटी जीवन संपवून घेतले. आजही राष्ट्रीयकृत बँकाचा शेतकऱ्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन निकोप नाही. त्याच्याकडे संशयाने पाहिले जाते, हिनतेने पाहिले जाते हा दृष्टिकोण बदलण्याची आवश्यकता आहे. अमेरिकेतील प्राध्यापक व आंतरराष्ट्रीय पाणी वाटप कायदयाचे तज्ञ स्टीफन मॅकाफ्री यांच्या प्रयत्नामुळे पाणी मिळणे हा प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे. याला संयुक्त राष्ट्रानी २०१० साली मानवी अधिकार म्हणून मान्यता दिली. पाणी हा शेती आणि शेतकऱ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय, शासन धरणे बांधताना शेकडो एकर जमिन बागायती होणार आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार आहे. कोरडवाहू शेती बागायती होईल, अशी अमिषे दाखवून मातीमोल भावात शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जातात, पण नंतर त्याच धरणातील पाणी शेतकऱ्यांना वापरण्यासाठी बंदी घातली जाते. कारण ते पाणी बाजुच्या शहराला पिण्यासाठी वापरायचे असते. उदाहरण म्हणून नांदेड येथील विष्णुपूरी प्रकल्पाचे घेता येईल. हा प्रकल्प मुळात उपसा जलसिंचन प्रकल्प आहे. त्यासाठी शासनाने मोठा खर्च करुन पाईपलाईन व्दारे बाजूच्या शेतीला पाणी देण्याची व्यवस्था केली आहे. पण आज हा प्रकल्प पुर्णतः नांदेड शहरासाठी पाणी पुरवठा करणारा प्रकल्प झाला आहे. शहरातील लोकांना पिण्यासाठी पाणी वापरणे हा हक्क आहेच. पण त्या पाण्यावर शेतकऱ्यांचा ही हक्क अहे हे विसरले जाते. तो पाणीसाठा राखीव म्हणून घोषित केला जातो. पण शहरातील अनेक लोक या पाण्यावर आपले

Late Babasaheb Deshmukh Gorthekar ... UMRI Pin-431807 (Maharashtra) Umri Dist Nanded

कमावतात
व्यवसाय चालवून पैसा कमावतात. एम.आय. डी. सी. छोटे उद्योग हे या पाण्याचा वापर करुन पैसा पाण्यावाचून
पण जे धरण शेतकऱ्यांसाठी बांधले त्या धरणामुळे अनेकांच्या जमिनी गेल्या त्यांचे पिक शेवटच्या एका धरणाच्या
वाळत आहे. हे शेतकरी पाहतो आहे. पण तो तळमळत बसण्याशिवाय कांहीच करु शकत नाही.
आजूबाजूचा विद्यूत पुरवठा तोडला जातो. शेतकऱ्यांना पाणी वापरण्यासाठी बंदी घातली जाते. डॉ. स्वामिनाथन
म्हणतात, भारतीय कृषि व्यवस्थेत काहीतरी भयंकर चूक होते आहे व जर कृषि क्षेत्रात चूक होत असेल तर इतर
कोणत्याहि क्षेत्राचे भले होऊ शकणार नाही.[४]शेतकऱ्यांच्या घरात अगोदरच दारिद्रय त्यातून हाती येणारं पिक
शासकीय नियोजना अभावी जात आहे. हे पाहताना त्याला नैराश्य येणारच आहे. शासनाने धरणातील पाणी
पिण्यासाठी राखीव साठा म्हणून घोषीत करण्यास कांहिच हरकत नाही. पाण्याचा वापर पिण्यासाठी झाला पाहिजे
हे मानवीय दृष्टिकोनातून योग्यच आहे. पण शेतकऱ्यांचे पिक शेवटच्या एका पाण्याशिवाय वाळत आहे. तर किमान
त्यांना नुकसान भरपाई तरी जबाबदार संस्थानी दिली पाहिजे. तरच शेतकरी जगेल नैराश्यापासून दूर राहिल.
अन्यथा तो रात्री अपरात्री धरणातील पाणी वाळणाऱ्या पिकांना देण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून पाणी
देण्यासाठी जाईल. मग प्रशासन त्याच्यावर खटले भरेल, अशा घटना शेतकरी आत्महत्येस कारणीभूत ठरत
आहेत. उदरनिर्वाहासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून तो पिक वाचविण्यासाठी धडपडतो आहे. याकडे
संवेदनशील दृष्टीने पाहिले पाहिजे. जसा धरणातील पाण्यावर शहरातील लोकांचा हक्क आहे तसाच ग्रामीण
भागातील शेतकऱ्यांचाही आहे. पण शेतकऱ्यांच्या हक्काकडे पुर्णतः दुर्लक्ष करुन शहरातील लोकांच्या हक्काचेच
रक्षण आज होताना दिसत आहे. या विषयी डॉ. मोहन धारिया म्हणतात की, भारतात स्वातंत्र्यानंतर जेवढे प्राधान्य
औद्योगिकरण आणि उद्योगधंद्यांना दिले त्या प्रकारची वागणूक कृषि व ग्रामीण क्षेत्राला दिली नाही.[५] या त्यांच्या
विधानाने वरील मताला अधिक पुष्टी मिळते. शेतकऱ्यांच्या मुलांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळणे त्यांचा अधिकार
आहे. आज प्राथमिक शिक्षणाची अवस्था जेवढी बिकट आहे त्यापेक्षा उच्चशिक्षणाची अवस्था बिकट आहे. जिल्हा
परिषदेच्या शाळांमधून बहुतांश शेतकरी, शेतमजुरांची मुले शिक्षण घेत आहेत. त्या शाळांचा दर्जा उंचावण्या ऐवजी
शासन ग्रामीण भागातून कायम विनाअनुदानित इंग्रजी माध्यमांच्या शाळांना मान्यता देत आहे. आर्थिक परिस्थिती
बिकट असूनही शेतकरी शेतमजुरांना वाटते की, या शाळामधून आपल्या मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळेल.
म्हणून ते इंग्लिश मेडियम स्कूल मध्ये मुलांना पाठवत आहेत. तेथील भरमसाठ फिस त्यांच्या संकटात अधिकच भर
घालते आहे. या शिवाय जी मुले माध्यमिक शिक्षण पुर्ण करुन उच्चमाध्यमिक शिक्षणासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी
येतात. आज कनिष्ठ महाविद्यालय केवळ कागदोपत्री प्रवेशापुरती उरली आहेत. बहुतांश मुले खाजगी
शिकवणीकडे वळली आहेत. जिल्ह्याच्या ठिकाणी राहण्याचा खर्च शिकवणीची फिस यांचा भार शेतकरी पालकांना
सोसवत नाही. एवढा खर्च ते करु शकत नाहीत. त्यामुळे आजची शिक्षणव्यवस्था शेतकऱ्यांच्या मुलांना स्वतःच्या
पायावर उभीकरण्यात अपयशी ठरत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून शिक्षणाविषयी उदासिनता दिसण्याचे प्रमुख
कारण म्हणजे शिक्षण महाग होणे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर रोजगार मिळण्याची शक्यता कमी असणे, शेतीतून
आपल्यामुलांनी बाहेर पडावे असे सतत शेतकऱ्यांना वाटते. त्यासाठी शिक्षण हे माध्यम आहे अशी आशा
शेतकऱ्यांना होती. पण त्या क्षेत्रातही निराशाच त्यांच्या वाट्याला आली. शिक्षणासारखा मुलभूत अधिकार अशा
प्रकारे शेतकऱ्यांचा डावलला जात आहे, त्यामुळे शेतकरी आत्महत्याकडे वळत आहेत. शेतकऱ्यांना आरोग्य सुदृढ
ठेवण्याचा किमान स्वच्छता मिळवण्याचा अधिकार आहे. ग्रामीण भागातून शिक्षणाचा अभाव, अज्ञान, रुढी परंपरा
आरोग्याचा स्तर खालावण्याचे प्रधान घटक आहेत. तो स्वतःअन्नधान्य पिकवणारा असूनही कुपोषण शेतकरी
कुटुंबात आहे. त्यात कमी वयात मुलांचे विवाह केले जातात. त्यामुळे कमी वजन व कमी बुध्दीमत्ता असलेली
कुपोषित बालके जन्माला येतात. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधीचा तुटवडा, शहरतून डॉक्टर
येण्यास उदासिन, प्रशासनातील भ्रष्टाचार यामुळे शेतकऱ्यांच्या आरोग्याचा अधिकार अशापध्दतीने डावलला जातो
त्यामुळे शेतकरी उदास व निराश होताना दिसत आहे. शेतकऱ्यांचे अधिकार डावलले जाणे हा शेतकऱ्यांच्या
आत्महत्यांना जबाबदार असलेला महत्त्वपूर्ण घटक आहे. शासनाची शेतकऱ्याप्रती उदासिनता, राजकीय नेत्यांचे
जाणिवपूर्वक दुर्लक्ष, शेतकरी कुटुंबातील शिक्षणाचा अभाव, शेतकऱ्यांमधील असंघटीतपणा, शेतीमालाला भाव नसणे

व भ्रष्ट प्रशासन हे घटक शेतकऱ्यांची व शेतीचीस्थिती नाजुक होण्यास कारणीभूत आहेत. [illegible]विषयी महात्मा फुल्यांनी मांडलेले विचार येथे आवर्जुन उल्लेख करावा वाटतो ते म्हणतात की, सरकारी गोरे अधिकारी हे बहुतकरुन ऐषआरामांत गुंग असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांचे वास्तविक स्थितीबद्दल माहिती करुन घेण्यापुरती सवड होत नाही व त्यांच्या गाफीलपणाने एकंदर सर्व सरकारी खात्यांत ब्राम्हण कामगारांचे प्राबल्य असते. या दोन्ही कारणामुळे शेतकरीर लोक इतके लुटले जातात की, त्यास पोटभर भाकर व अंगभर वस्त्रही मिळत नाहीत.[६] महात्मा फुल्यांचे हे मत आज तंतोतंत लागू पडते आहे. फरक एवढाच आहे, गोरे अधिकारी या ऐवजी काळे अधिकारी आज आहेत. पण प्रवृत्ती तीच आहे. त्यामुळे शेतकरी नडला जातो, निराश होवून आत्महत्याकडे वळतो आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या फेब्रुवारी २०१७ च्या दीक्षांत समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना मा. शरद पवार म्हणाले, शेतीवरचा भार कमी केला पाहिजे हे विधान अत्यंत महत्वपूर्ण आहे. यात निश्चितच तथ्य आहे. ग्रामीण भागातील कुटुंब पुर्ण पणे शेतीवरच अवलंबून आहेत. कुटुंबातील सदस्य संख्या वाढते आहे. शेतीमात्र तेवढीच आहे उलट तीचे तुकड्यात रुपांतर होते आहे. याचा उत्पादनरावर ही परिणाम होतो. त्यामुळे शेतकरी कुटुंबातील काही सदस्यानी शेतीपुरक व्यवसाय किंवा स्वतंत्र व्यवसायाकडे वळले पाहिजे. पण असा विचार प्रत्यक्ष कृतीत आणणे खुपच अवघड असते. कोणत्याही व्यवसायाकडे वळायचे म्हणजे सर्वप्रथम भांडवल आवश्यक असते. त्यानंतर त्या क्षेत्रातील व्यवसायज्ञान या बाबीची कमतरता शेतकऱ्यांकडे आहे. शेतीवरचा भार कमी करण्यासाठी शासनाचे धोरण शेतकऱ्यांना अनुकूल असले पाहिजेत. २००७ मध्ये पी. साईनाथ म्हणाले की, देशाची राष्ट्रीय आर्थिक ध्येय धोरणेच शेतकऱ्यांच्या आत्महत्येला जबाबदार आहेत. त्यात देशाचे आयात निर्यात धोरण, सबसिडी धोरण, बाजार यंत्रणा, पतपुरवठा धोरण, पिक विमा धोरण, पंचवार्षिक योजना धोरण व त्यातील तरतुदी, कृषि व्यवसायासाठी राबवल्या जात असलेले विविध आर्थिक धोरण हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत आहेत.[७] ही धोरणं शेतकऱ्यास अनुकूल बलवली तरच शेतकऱ्यांना इतर व्यवसायाकडे वळविता येईल व शेतीवरचा भार कमी करणे, शक्य होईल. अनेक शेतकऱ्यांना शेतीकरण्याची इच्छा नाही. पण ते नाइलाजाने शेतीकरतात. अनेकांना शेतीतून बाहेर पडण्याची इच्छा असते. पण मार्ग सापडत नाहीत. मा. मनमोहनसिंग प्रधानमंत्री असताना विदर्भातील दौऱ्यात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींना भेटले तेंव्हा त्या स्त्रियांनी व्यक्त केलेली भावना महत्त्वपूर्ण आहे. त्या म्हणाल्या, साहेब आम्हाला कोणत्याही स्वरुपाची मदत नको, चपराश्याची (सेवकाची) नौकरी द्या पण नौकरी द्या. या त्यांच्या भावना अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. त्यांना कष्टनकरता कांही नको कष्ट करण्याची मानसिकता आहे. पण ते शेती करण्यास तयार नाहीत. शेतीतील आत्मविश्वास त्या गमावून बसल्या आहेत. त्यामुळे शेतीतून बाहेर पडण्याची त्यांची इच्छा प्रबळ आहे. त्यांनी आजपर्यंत शेतीततील मरण प्राय वेदना पाहिल्या आहेत. याच शेतीने त्यांच्या पतीचे प्राण घेतले आहेत. पुन्हा आपल्या मुलांनी कोणत्याही परिस्थितीत शेतीत राहू नये असे त्यांना वाटते. भास्कर भोळे म्हणतात, समाजात जे कांही आज घडते आहे ते अवांछनीय असले तरी त्याविरुध्द समाजाचे सगळे घटक एकमुखाने आवाज उठवतांना मात्र दिसत नाहीत, उलट शेतीशी संबंधित नसलेले मध्यमवर्गातील कांही लोक तर ह्या परिस्थितीत सुखावल्यासारखे दिसतात हे जेव्हा शेतकरी पाहतो तेव्हा तो स्वतःला दोष देतो अधिकच खंतावता आज समाजात जे कांहीविपरीत घडत आहे आणि त्याची झळ मुख्यत्वेकरुन शेतकऱ्यांनाच लागत आहे. त्याच्या विरोधात संपूर्ण समाजाचा आवाज संघटित स्वरुपात उठत नाही ह्याचा अर्थ समाजाला आपल्या सुखदु:खाशी काहीही घेणेदेणे नाही असाच शेतकऱ्यांना वाटतो समाजाच्या ह्या असंवेदनशील बधिरीकरणामुळे शेतकरी अधिकच अगतिक होतो आणि आत्मघाताकडे त्याचा कल होतो.[८] अशारितीने शेतकऱ्यांचे हक्क डावलले जाणे हा महत्त्वपुर्ण घटक शेतकरी आत्महत्यास जबाबदार आहे असे दिसून येते.

**निष्कर्ष:**

बहुतांश शेतकऱ्यांना शेतीकरण्याची इच्छा नाही पण शेतीतून बाहेर पडणे शक्य होत नाही, शेती सोडण्यासाठी पर्यायी व्यवस्था त्यांच्याकडे नाही म्हणून शेतकरी आपले जीवन संपवून घेतात.

शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या जाणीवपुर्वक केलेली कृती आहे. ती लहर किंवा मानसिक संतूलन बिघडल्याने केलेली कृती नव्हे.

शेतकऱ्यांच्या अधिकारांचे शासनाने रक्षण केले, सर्वप्रकारच्या अधिकाराकडे शासन व प्रशासनाने संवेदनशिलतेने पाहिले तर आत्महत्या कमी होतील.

पाणी वापरास पिण्यासाठी प्रथम प्राधान्य दुसरे शेतीसाठी तर तिसरे औद्योगिक क्षेत्रासाठी असा क्रम लावून शेतीक्षेत्रास प्राधान्य दिले तर आत्महत्या निश्चितच कमी होतील.

कार्पोरेट क्षेत्रातील व्यक्तीप्रमाणे शेतकऱ्यास बँका वागणूक देत नाहीत. कार्पोरेट क्षेत्राप्रमाणेच शेतीक्षेत्रातील व्यक्तींची पत बँकानी केली तर आत्महत्या रोखता येतील.

शेतीवरचा भार कमी करण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांस अनुकूल अशी धोरणे आखली पाहिजेत. पायाभूत सुविधा ग्रामीण भागात निर्माण केल्यास नवनविन व्यवसायाकडे शेतकऱ्यांस वळता येईल व शेतीवरील भार हलका होईल त्यातून शेतकरी आत्महत्या रोखता येतील.

शेतकरी शेतीक्षेत्रातील विश्वासार्हता गमावून बसला आहे. ती विश्वासार्हता परत मिळवून देण्यासाठी शेतीमालाला हमीभाव देवून शेतमालाची किंमत ठरवण्याची पारंपरिक बिट पध्दत बंद केली तर शेती क्षेत्राला व शेतकऱ्यांना चांगले दिवस येतील.

शेतकऱ्याच्या जीवनात आर्थिक अस्थिरता आहे. ही अस्थिरता बहुमुखी असल्यामुळे फार मोठे बदल त्यांच्या जिवनात होत आहेत, या बदलांचा संबंध आत्महत्यांशी आहे.

शेतकऱ्यांचे प्रश्न हे खोलवर गेले आहेत. पण केंद्र व राज्य सरकार या प्रश्नाकडे गांभीर्याने न पाहता मामुली समस्या म्हणून पाहतो आहे. व पॅकेजसारखी नैमित्तिक उपाय करीत आहेत. यामुळे शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न सुटणार नाही तर शासनाने त्याकडे गांभीर्याने पाहून कायनस्वरुपी उपाययोजना केल्या पाहिजेत.

## संदर्भ सुची

*Farmers suicide in India, Feb. 2nd 2010, Seminar papers, priyadarshini mahila Mahavidyalaya, wardha, page no. 01.*

*लोकसत्ता,०२ मार्च २०१७, पृष्ठ ०७*

*लोकसत्ता,१५ मार्च २०१७, पृष्ठ ०७*

*Farmers suicide in India, Feb. 2nd 2010, Seminar papers, priyadarshini mahila Mahavidyalaya, wardha, page no. 31.*

*शेतकऱ्यांच्या आत्महत्या: समस्या आणि उपाय, शिंदे विनायक, प्रथमावृत्ती २०१५, सुर्यमुद्रा प्रकाशान, नांदेड, पृष्ठ २९.*

*महात्माफुले समग्र वाड्.मय, संपा. य. दि. फडके, सुधारित आवृत्ती १९९१, पृष्ठ २६८.*

*तत्रैव, क्र. ०५, पृष्ठ २४.*

*Farmers suicide in India, Feb. 2nd 2010, Seminar papers, priyadarshini mahila Mahavidyalaya, wardha, page no. 05.*

Principal
Late. Babasaheb Deshmukh
Gorthekar Arts, Commerce
& Science Mahavidyalaya,
Umri Dist. Nanded. [M.S.]

Golden Research Thought

Volume - 6 | Issue - 7 | January - 2017

International Recognition Multidisciplinary Research Journal

4.6052(UIF) 2231-5063

# वारकरी संतांचा संपत्तीविषयक दृष्टिकोन



प्रा. डॉ. संभाजी जाधव

संभाजी जाधव

मराठी विभाग प्रमुख, कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी.

सारांश :– वारकरी संतांचा संपत्तीविषयक दृष्टिकोनाचे मूळ त्यांच्या समाजचिंतनात आहे. संपत्ती ही व्यक्तीचे लौकिक जीवन अधःपतित होण्यास कारणीभूत ठरू शकते, ही बाब सर्वच संतांनी लक्षात घेतली आहे.....

Editor - In - Chief - Dr. T. N. SHINDE

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya Umri Pin-431807 (Maharashtra)


| | | |
|---|---|---|
| 7 | Scams, Sebi And The Indian Stock Market<br>Dr. Isha Jaiswal1 and Vikas Jaiswal2 | 37 |
| 8 | Explorations Of Various Statistical Techniques In Marketing<br>N.Udaya Prakash , S. Balaji and Mohana Priya | 44 |
| 9 | Sports Can Prevent Youth Crime<br>Dr. A. Mili | 50 |
| 10 | वारकरी संतांचा संपत्तीविषयक दृष्टिकोन<br>प्रा. डॉ. संभाजी जाधव | 53 |

GRT

GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 7 | JANUARY - 2017

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya, Umri Dist. Nanded
UMRI
Pin-431807
(Maharashtra)

# वारकरी संतांचा संपत्तीविषयक दृष्टिकोन

प्रा. डॉ. संभाजी जाधव
मराठी विभाग प्रमुख , कै बाबासाहेव देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी ,
ता. उमरी जि. नांदेड.



वारकरी संतांचा संपत्तीविषयक दृष्टिकोनाचे मूळ त्यांच्या समाजचिंतनात आहे. संपत्ती ही व्यक्तीचे लौकिक जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी आवश्यक आहे; पण संपत्तीचा अतिरेकी हव्यास हा व्यक्तीचे लौकिक जीवन अध:पतित होण्यास कारणीभूत ठरू शकते, ही बाब सर्वच संतांनी लक्षात घेतली आहे. संत नामदेवांनाही संपत्तीचा अतिरेक हा व्यक्ती ला भुरळ पाडणारा, व्यक्तीचे, समाजाचे मन:स्वास्थ बिघडविणारा वाटला. म्हणून ते म्हणतात, "आतां आहे नाहीं पाहतां क्षण एक । संपत्तीचे सुख विषय हा ।।१।। हितं तें आचरा हित तें विचारा । नामीं भाव धरा जाणतेनो ।।२।। संपत्तीच्या बळें एक जाले आंधळे । वेढिलें कळिकाळें स्मरण नाहीं ।।३।।"[१] संपत्तीचे सुख क्षणात आहे, नाही. त्यामुळे दीर्घकाळ असलेल्या सुखाचा विचार करावा. माणसाला जीवन जगताना आवश्यक अशी संपत्ती कमी लागते; पण सुखचैनीसाठी कितीही पुरत नाही. संपत्तीच्या मागे व्यक्ती लागली तर ती आंधळा होते. तिला दु:खाने कधी वेढले हेसुद्धा लक्षात येत नाही. परधन तर दगडाप्रमाणे मानावे, हा नामदेवांचा संपत्तीविषयक दृष्टिकोन नैतिकतेवर आधारलेला आहे. ही नैतिकता समाजाचे मानसिक आरोग्य टिकविण्यास उपयुक्त ठरते. त्यामुळे समाजाची वाटचाल योग्य दिशेने होण्यास मदत होते, असे वाटते.

संपत्तीचा अभिमान फार काळ टिकत नसतो. मुळात कोणताही अभिमान धरू नये, हा विचार व्यक्त करताना नामदेव म्हणतात, "देह पडे तोंवरी देहाचा अभिमान । न करीं मी अज्ञान आत्महित ।।१।। मी माझे म्हणतां गेले नेणों किती । रंक चक्रवर्ती असंख्यात ।।२।। क्षणक्षणा देहीचे आयुष्य पैं झडें । वासना ते वाढे नित्य नवी ।।३।। ..........जंववरी संपत्ति तंववरी हे सखे । गेलिया ते भुंके सुणें जैसे ।।५।।"[२] संपत्तीचा अभिमान आत्महित करणारा नाही. या सृष्टीत कितीतरी लोक असे होऊन गेले जे धनवान होते; पण नंतर त्यांचे नावही लोक लक्षात ठेवीत नाहीत. त्यामुळे त्यात हित नाही. संपत्तीने क्षणाक्षणाला नित्य नवी वासना उदयाला येते आणि संपत्ती असेपर्यंतच सखे-सोबती आहेत. संपत्ती गेल्यानंतर बिकट अवस्था होते, असे सांगून संपत्ती हे केवळ जगण्याचे साधन असावे साध्य असू नये, असे त्यांना वाटते. त्यातून त्यांचा संपत्तीविषयक दृष्टिकोन हा आवश्यक संपत्तीचे समर्थन करणारा, तर संपत्तीचा हव्यास हा अध:पतनाकडे नेणारा असल्याचा वाटतो.

संत सेना न्हावी याचा संपत्तीविषयक दृष्टिकोन हा उदास असल्याचे जाणवते. प्रत्येक अडचणीत धनाचा उपयोग होईल, याची खात्री नसून विवेक व सद्गुणच उपयोगाला येतात, असे त्यांना वाटते. तरीपण लोक संपत्तीच्या मागे धावताना दिसतात. अशा लोकांना ते म्हणतात, "धन कोणा कामा आलें । पहा विचारूनि भले ।।१।। ऐसें सकळ जाणती । कळोनियां आंधळे होती ।।२।। स्त्रिया पुत्र बंधु पाही । त्याचा तुझा संबंधु नाहीं ।।३।। सखा पांडुरंगा विणि । सेना म्हणे दुजा कोण ।।४।।"[३] सर्वच जाणतात की, धन कामाला येईल याची शाश्वती नाही. तरीपण आंधळे होऊन त्यामागे का धावता, असा प्रश्न सेना न्हावी विचारतात. त्यामुळे जेवढी गरज तेवढेच धन ठेवा, असा त्यांचा दृष्टिकोन दिसून येतो.

संत भानुदास याचा संपत्तीविषयक दृष्टिकोन अत्यंत वेगळ्या स्वरूपात व्यक्त झाला असून, संपत्ती ही खोटी प्रतिष्ठा प्राप्त करून देते व खोटी स्तुती करणाऱ्या लोकांना भोवती जमा करते, असे सांगताना ते म्हणतात, "भांबावसी कां रे माझे माझे म्हणसी । कोण हे कोणासी कामा आले ।।१।। घेई तूं अनुभव कोणाचे ते कोण । अंतकाळीं जाण पारखे होती ।।२।। जवळी असतां धन कांही रुका । तेव्हां म्हणती सखा दादा भाई ।।३।।

हीनपणें म्हणती अभागी करंटा । जन्म फुकटा मरतां बरें ।।४।।''[४] यातून संपत्तीची मर्यादित आश्यकताही ते व्यक्त करतात आणि अनुभव घ्यावयास सांगतात की, केवळ संपत्ती असेपर्यंतच सखा, दादा म्हणतील. संपत्ती गेली तर अभागी, करंटा म्हणतील. या विचारातून सामाजिक संबंधाचे त्यांचे चिंतन किती सखोल आहे, हे दिसून येते.

संत एकनाथांनी संपत्तीविषयक दृष्टिकोन विस्तृतपणे व्यक्त केला आहे. धन हे मातीसमान ज्यांना वाटेल तोच साधू, असे ते म्हणतात. नाथ संपत्ती, साधू, संसारी, व्यापारी, धनिक, कंजूष या सर्वांविषयीचा त्यांचा दृष्टिकोन व्यक्त करतात. धन केवळ कामासाठी आवश्यक आहे, तेवढ्यापुरतेच त्याकडे पाहा, तरच मनात दोष निर्माण होत नाहीत, असे सांगून ते पुढे म्हणतात, "घालूनियां काखे धन । सदा मागे जो कोरान्न ।।१।। धन्य वायां जिणें पाही । श्वान सूकर सम तेही ।।२।। असो नियां दरिद्रता । सदा धर्मावरी चिंता ।।३।। द्रव्य पदरी बहू आहे । अतिथि रिक्त हस्ते जाये ।।४।। एका जनार्दनी ऐसे पामर । नरक भोगती अघोर ।।५।।''[५] ज्याच्याकडे धन आहे, पण तो त्याचा उपयोग न करता सदा कोरान्न मागत फिरतो, अशाचे जीवन व्यर्थ आहे. घरात संपत्ती असून ही दारावरील अतिथी रिकाम्या हाताने परत जात असेल, तर त्याच्यासारखा दुष्ट कोणी नाही, हा विचार संपत्तीची उपयुक्तता व तिचा हव्यास न धरता योग्य वापर करण्यास सुचविणारा आहे.

धनलोभी माणसाविषयी अभंगातून विचार व्यक्त करताना ते म्हणतात, "धन लोभ्याचें जाय धन । शोधितसे रात्रंदिन ।।१।। त्यांची निंदा करतील लोक । रांडा पोरें भुंकती देख ।।२।। भिकेलागीं जेथ गेला । म्हणती काळतोंडा आला ।।३।। हाता धनलोभें भुलला । संचित ते बरा नागविला ।।४।। ऐसें धनाचें कारण । शरण एका जनार्दन ।।५।।''[६] लोभी माणसाचे धन गेल्यास तो रात्रंदिवस शोधील. लोक त्याची निंदा करतील. पत्नी-मुले टाकून बोलतील. असे धनामुळे होऊ शकते. त्यापेक्षा त्याचा योग्य वापर केल्यास ही वेळ येणार नाही. एकूणच, संत एकनाथांचा संपत्तीविषयक दृष्टिकोन हा व्यक्तिगत उपयुक्ततेचा असून संपत्तीमुळे अनेक संकटे ओढवू शकतात, ती टाळायची असतील तर तिचा योग्य वापर करा, असे ते म्हणतात. संपत्तीचा अतिरेकी संचय हा संकटात नेऊ शकतो त्यामुळे ही संपत्ती इतरास देण्यासंदर्भात ते जे म्हणतात, ते संपत्तीचे विकेंद्रीकरण असून, संपत्तीवर सर्वांचा अधिकार असल्याची जाणीव त्यांना आहे. म्हणून तिचा योग्य वापर व इतरांना दान, हा विचार सामाजिक संतुलन राखणारा व दूरदृष्टी असलेला आहे.

संत तुकारामांचा संपत्तीविषयक दृष्टिकोन व्यापकपणे व्यक्त झाला आहे. उत्तमपणे धन मिळवा; पण आवश्यक तेवढेच, या विचाराचे त्यांनी समर्थन केले आहे. नंतरच्या अभंगांत मात्र संपत्तीविषयी त्यांचा दृष्टिकोन उदास होत गेल्याचे जाणवते. सुरुवातीला धन कसे जोडावे, याविषयी सांगताना ते म्हणतात, "जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदास विचारे वेंच करी ।।१।। उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ।।२।।''[७] उत्तम ग्रहस्थाश्रमाच्या स्वरूपाचे वर्णन करताना ते म्हणतात, उत्तम व्यवहाराने संपत्ती मिळवून तिचा योग्य विनियोग करावा. ही शाश्वत नीतिमूल्यांची शिकवण देऊन 'उत्तम बना' असा दृष्टिकोन बाळगतात. काही लोक संन्यासी होऊन भिक्षा मागतात, याचा तुकाराम निषेध करतात. अशा प्रवृत्तीने परमेश्वरप्राप्ती होत नसून, ज्याची परमेश्वरावर निष्ठा आहे, त्याने आपले कर्तृत्व पणाला लावून उद्योगी बनावे व उत्तम धन मिळवावे, अशा लोकांना ईश्वर प्राप्त होतो. तेच उत्तम गती पावतील व त्यांच्याच वाट्याला उत्तम जीवन येईल, असे ते म्हणतात. संपत्ती जोडताना तिचा हव्यास धरू नये. हव्यास धरला तर काय होते, याविषयी ते म्हणतात, "जोडीच्या हव्यासें । लागे धनाचेंचि पिसें ।।१।। मग आणीक दुसरें । लोभ्या नावडती पोरें।।२।।''[८] संपत्ती जमा करण्याचे वेड एकदा लागले, तर त्या लोभी जीवाला संपत्तीशिवाय काहीही दिसणार नाही. स्वतःची मुलेसुद्धा त्याला आवडणार नाहीत. हा दृष्टिकोन संपत्तीची हाव कमी करणारा असून आवश्यक तेवढीच संपत्ती असावी, असा विचार व्यक्त करणारा आहे.

धन कितीही जास्त मिळविले तरी आवश्यकतेपेक्षा अधिक वापरता येणार नाही. मृत्यू अटळ असून, त्यानंतर त्या संपत्तीचा काय उपयोग, असे सांगताना ते म्हणतात, "धन मेळवूनि कोटी । सवें नये रे लंगोटी ।।१।।''[९] कितीही संपत्ती मिळविली तरी शेवटी सोबत काहीच येणार नसून, सर्व व्यर्थ आहे. यातून त्यांनी संपत्ती आणि जीवन यांच्या अशाश्वततेवर खोल प्रकाश टाकला आहे. एखाद्याने आयुष्यभर संपत्तीच्या राशीच्या राशी मिळवाव्यात, त्यांची प्राणपणाने जपवणूक करावी आणि एक दिवस सर्व वैभव सोडून जावे. ही मानवी जीवनातील शोकांन्तिका ते परखडपणे व्यक्त करतात. त्यामुळे निश्चितच संपत्तीचा हव्यास कमी होईल आणि तोच दृष्टिकोनही त्यांचा असावा, असे वाटते. पण, मृत्यू अटळ आहे हे माहीत असूनही माणसाचा संपत्तीचा हव्यास काही कमी होताना दिसत नाही, तेव्हा ते म्हणतात, "करूनि जतन । कोणा कामा आलें धन ।।१।। ऐसें जाणत जाणतां । कां रे होतोसी नेणता ।।२।।''[१०] आयुष्यभर धन साठवून ठेवतोस; पण त्यापासून आजपर्यंत कोणाला किती फायदा झाला आहे, जे जतन केले ते मरणानंतर कोणाला उपयोगी पडले काय, मग तू हे सर्व जाणत असूनही असा नेणता का बनतो आहेस, असा सवाल ते करतात व त्यातून संपत्तीचा मानवी मनातील लोभ कमी करण्याचा प्रयत्न करतात.

तुकारामांचा संपत्तीविषयक दृष्टिकोन पुढे बदलत जातो व संपत्तीची विरक्ती त्यांच्यात निर्माण होते. ते म्हणतात, "द्रव्याचा तो आम्हीं धरितो विटाळ । तयापाठीं काळ लाग धरी ।।१।।(५०७) द्रव्याचिया मागें कळिकाळाचा लाग । म्हणोनियां संग खोटा त्याचा ।।१।।(५०८) ''[११] संपत्तीचा संग नको. त्याचा विटाळ होतो. कारण त्याचा संग खोटा आहे. ही भूमिकाच त्यांना संपत्तीबाबत विरक्ती निर्माण करणारी आहे, असे दिसून येते. पुनःपुन्हा सांगूनही लोक ऐकत नाहीत, हे दिसल्यावर त्यांची वरीलप्रमाणे भावना तयार झाली असावी, असे वाटते. जीविताच्या क्षणभंगुरतेच्या व संपत्तीच्या चंचलतेच्या पुनःपुन्हा उच्चाराने तुकाराम संपत्तीचा द्वेष करीत होते, काय असे वाटण्याचे कारण नाही. तसे ते करीत नसून संपत्तीविषयी त्यांनी घृणा कधीच व्यक्त केली नाही. तर, संपत्ती जीवनात सर्वस्व नसून, ती फक्त सत्कारणापुरती वापरावी; तसे करण्याणेच लोककल्याण होते, याची जाणीव त्यांना आहे. एकूणच, त्यांचा संपत्तीविषयीचा दृष्टिकोन हा समाजोपयुक्त व समाजस्वास्थ राखणारा असून, समता प्रस्थापित करणारा आहे, असे वाटते. एक व्यावहारीक वास्तव त्यांनी अनेक अभंगांतून व्यक्त केले आहे. स्वतः त्यांनी श्रीमंतीपासून गरिबीपर्यंतचा अनुभव घेतला होता.

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya, Umri, Pin-431807 Maharashtra

त्यामुळे संपत्तीचे महत्त्व व तिचा हव्यास धरल्यास होणारे परिणाम, यांची जाणीव त्यांना होती त्यामुळे तुकारामांचा संपत्तीविषयक दृष्टिकोन त्यांच्या अनुभवातून व सामाजिक निरीक्षणातून तयार झाला आहे, असे वाटते.

अशा रीतीने वारकरी संतांचा संपत्तीविषयक दृष्टिकोन त्यांनी आपल्या अभंगातून व्यक्त केला आहे. कुटुंब, समाज व व्यक्ती यांना संपत्तीचे महत्त्व व तिच्या हव्यासाचे संभाव्य परिणाम, अशा दोन्ही बाजूंनी संतांनी अत्यंत मूलभूतपणे तत्कालीन समाजाला व आजच्या समाजालाही उपयुक्त ठरेल, असा दृष्टिकोन व्यक्त केला आहे.

## संदर्भ सुची

०१. दांडेकर शं. वा. (संपा.), श्री नामदेव गाथा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पुनर्मुद्रण २००८, पृष्ठ-२७८.
०२. तत्रैव, पृष्ठ-७१६.
०३. श्री सकलसंतवाणी (खंड पहिला), गीता प्रेस, गोरखपूर, चतुर्थ पुनर्मुद्रण, पृष्ठ-२६८-२६९.
०४. श्रीसकलसंतवाणी (खंड दुसरा), गीता प्रेस गोरखपूर, चतुर्थ पुनर्मुद्रण, पृष्ठ- ०६-०७.
०५. तत्रैव, पृष्ठ-३१९.
०६. तत्रैव
०७. बेणारे गोपाळराव गोविंद(संपा.), सार्थ तुकाराम गाथा, शारदा साहित्य, पुणे, पृष्ठ-४५२.
०८. तत्रैव, पृष्ठ-७५५.
०९. तत्रैव, पृष्ठ-६२५.
१०. तत्रैव, पृष्ठ-४३१.
११. तत्रैव, पृष्ठ-१२६.

Principal
Late. Babasaheb Deshmukh
Gorthekar Arts, Commerce
& Science Mahavidyalaya
Umri. Dist. Nanded. [M.S.]

2.2.1
10 13 9



Late Babasaheb Deshmukh Gorthekar ... UMRI Pin-431807 (Maharashtra) ... Umri Dist. Nanded

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

**Jan. To Mar. 2017**
**Issue-17, Vol-11**

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
Mobi. 09850203295, 07588057695

16) वारकरी सांप्रदायिक कीर्तनाची स्वरुप वैशिष्ट्ये || 65
प्रा.डॉ. एच.डी. आकोटकार, जि. बुलडाणा.

17) देऊळगाव राजा शहरातील नागरिकांसाठी ग्राहक संरक्षण कायद्याची उपयोगिता व जनजागृती- एक चिकित्सक अभ्यास || 68
प्रा. डॉ. विनोद रतिराम बन्सिले, देऊळगाव राजा

18) वस्तु व सेवा विक्रीमध्ये प्रसारमाध्यमांची भूमिका || 72
डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे, धुळे.

19) वारकरी संतांचा सामाजिक सुधारणावादी दृष्टिकोन || 75
प्रा. डॉ. संभाजी जाधव, जि. नांदेड

20) मराठी आणि हिंदीतील दलित कविता || 78
प्रा. डॉ. विजय विष्णुपंत केसकर, जि.पुणे

21) भूतान आणि भारताची बाह्य, अंतर्गत उर्जा सुरक्षा || 81
प्रा. डॉ. एस. पी. ढाके, प्रा. दिनेश दयाराम माळी, जि. धुळे

22) वारुताई वासुदेव दास्ताने यांचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात योगदान || 83
प्रा. डॉ. दिनेश रामदास महाजन, जि.जळगाव

23) लातूर जिल्हयातील अनुदानित महाविद्यालयीन ग्रंथालयात सिक्स सिग्मा या तंत्राचे उपयोजन : एक अभ्यास || 86
श्री. धनंजय एल. मोतेवार, जि. लातूर, डॉ. सौ. शालीनी एम. साखरकर, जि. नागपूर

24) मधु सावंत यांच्या कथेतून आलेले ग्रामीण राजकीय वास्तव || 90
प्रा. संगीता मुंढे, हिंगोली.

25) संत कवयित्री जनाबाईच्या काव्यातील प्रतिमासृष्टी || 92
माया विठ्ठलराव पराते, नागपूर

26) दुर्गा भागवत यांच्या 'ऋतुचक्रातील' निसर्ग वर्णनाचे वेगळेपण || 95
प्रा. किशोर आर. पाठक, जि. जळगांव

27) मराठवाडयातील पाणलोट क्षेत्राचीसद्य परिस्थिती : एक अभ्यास || 96
डॉ. पाटील बी. ए., केज.

28) श्री क्षेत्र तुळजापूर : एक जागृत शक्तिपीठ || 100
प्रा. पाटील व्ही.एम., बीड

29) अनुसूचित जाती—जमातींसाठी समावेशक योजना आणि कार्यक्रमाचे विश्लेषण || 102
प्रा. सुप्रिया दिनानाथ पावसकर, रत्नागिरी

30) दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर व मराठवाडा विकास - एक दृष्टीकोन || 105
प्रा. साबळे बालाजी आनंदा, जि.बीड

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com

Late Babasaheb Deshmukh Gorthekar Mahavidyalaya, Umri Pin-431807 Dist. Nanded (Maharashtra)

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta™ | Jan. To Mar. 2017
Issue-17, Vol-11 | 075

माहिती, प्रलोभने व अतिशोयोक्ती करुन लोकांना फसविले जाते.

३) वस्तुची सत्यता लपविली जाते.

४) नको असलेली विधाने बारिक अक्षरात छापली जातात.

५) ग्राहकांमध्ये गोंधळ किंवा संभ्रम निर्माण होतो.

६) उत्पादन खर्चात वाढ होते.

७) राज्यकर्त्यांची हातची बाहुले बनली आहे.

* सारांश:-

वरिल प्रमाणे प्रसार माध्यमावर टिका करण्यात येत असल्यातरी आज जागतिकीकरणाच्या व स्पर्धेच्या काळात प्रसारमाध्यमामुळे वस्तुला निर्माण होणारी मागणी, त्यामुळे वस्तुच्या विक्रीत होणारी वाढ, वस्तु व सेवांच्या उत्पादनात होणारी वाढ, रोजगारात वाढ आणि यातुन नविन संपत्तीची होणारी निर्मिती हा क्रम प्रसारमाध्यमाचे सहाय्य होते ही गोष्ट स्पष्ट आहे.

* संदर्भ ग्रंथ :-

१) विपणन प्रक्रिया आणि प्रसिद्धी- प्रा. एल.पी. वाकळे.

२) भारतातील प्रसारमाध्यमे काल आणि आज- जे.व्ही. विलानिलम, अनुवाद- जयमत दळवी.

३) जाहिरातीचे जग- यशोदा भागवत.

४) पत्रकारिता रूप आणि स्वरूप- डॉ. निशीगंधा व्यवहारे.

५) मीडिया शोध- ऋतु गोठी.

❑❑❑

**19**

# वारकरी संतांचा सामाजिक सुधारणावादी दृष्टिकोन

**प्रा. डॉ. संभाजी जाधव,**
मराठी विभाग प्रमुख,
कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी जि. नांदेड

**********

वारकरी संतांची विचारधारा सुधारणवादी असून, त्यांचा समाजाकडे आणि धर्माकडे पाहण्याचा एक स्वतंत्र दृष्टिकोन आहे. समाजातील दोष दूर करून समाज व धर्म यात सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी अनेक प्रकारे प्रयत्न केले. अभंग हे त्यापैकी एक माध्यम आहे. अभंगातून समाज, व्यक्ती, धर्म यांत सुधारण घडवून आणण्यावर त्यांनी अधिक भर दिला आहे. संतांच्या काळात धर्मात पाप-पुण्य, मोक्ष या नावाखाली ज्या अनेक वाईट गोष्टी चालत होत्या, त्यांची संतांना काळजी वाटत असे व त्यातून समाजाचे हित करावे, ही भावना तयार झाली. धर्माचे, परमेश्वराचे खरे स्वरूप समाजासमोर आणण्याचे प्रयत्न त्यांनी केले. प्रत्येक कालखंडात संतांनी सामान्य माणसाचे नेतृत्व करीत विधायक सुधारणा झाल्या पाहिजे, ही भूमिका घेतल्याचे दिसून येते. प्रसंगी त्यांनी सुधारणा घडवून आणण्यासाठी कठोर शब्दांनी प्रहार केले; पण समाजाच्या दुर्वर्तनावर, प्रहार करीत असताना त्यांनी समाजाला कधी अपमानित केले नाही. समाज किंवा व्यक्तीमधे बदल घडवून आणण्यासाठी त्याला अपमानित करण्याची आवश्यकता नाही, हे ते जाणत होते. त्यामुळे त्यांनी कधी परमेश्वरभक्तीच्या माध्यमातून, तर कधी प्रेमळ शब्दांतून समाजाला त्याची चूक लक्षात आणून दिली.

संत नादेमवांनी देशात भ्रमंती केली असल्यामुळे तत्कालीन समाजाचे त्यांनी सूक्ष्म निरीक्षण केले. त्यातून त्यांनी कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक, व्यक्तिमन, परमेश्वर अशा अनेक विषयांवर अभंगरचना केली. यात वेळोवेळी सुधारण झाली पाहिजे, असे त्यांना वाटत असे. व्यक्तीने विवेक जपला पाहिजे, हे सांगताना ते म्हणतात, "सर्व पाप पुण्य हीचिं दोन्हीं भांडी । विवेक न सांडी येतां जातां।।१।।"[१] चांगले व वाईट यांतील फरक जाणण्याची ताकद विवेकाने प्राप्त होत असते. त्यामुळे विवेक जपा, असे नामदेव म्हणतात. त्यांनी व्यक्ती व समाज अधिकाधिक कसा विवेकशील

Late Babasaheb Deshmukh ... UMRI Pin-431807 (Maharashtra)

बनवता येईल, यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

संत नामदेवांच्या सुधारणावादी भूमिकेला स्पष्ट करणारे अनेक अभंग दिसून येतात. त्यांतील एक असा आहे "आम्ही परीट चोखट । शुद्ध केलें खटनट ।।१।। बोध साबण लाऊनी ठायी । डाग उडविला पाही ।।२।।शांति शिळेवरी धुतले । ज्ञानगंगे निर्मळ जालें।।३।। परब्रम्ह होउनी ठेलों । नामा म्हणे सुखरूप जालों।।४।।"[२] येथील भूमिका ही परिटाची असून, ती सूचक आहे. खटनट ह्या सर्वांना शुद्ध करण्याचे काम नामदेव करीत आहेत. बोधरूपी ज्ञानाचा साबण आहे. त्यामुळे चारित्र्य, मन, बुद्धीवरील अनेक प्रकारचे डाग धुतले जात आहेत. हे सर्व शांतिरूपाने चालू असून, त्यात समाजाची घडी विस्कटत नाही. ज्ञानरूपी निर्मळ समाज पाहून नामदेव समाधानी होतात. ही भूमिका सुधारणावादी आहे.

ईश्वरापुढे सर्व माणसे समान आहेत. तेथे जातिभेदाला काही किंमत नाही. ईश्वरीय सेवाभावालाच महत्त्व आहे, असा सुधारणावादी दृष्टिकोन सर्वच वारकरी संतांनी घेतला. त्यात संत जनाबाईने अशीच भूमिका घेतली असून, तिच्या अभंगातून त्याचे अनेक दाखले देता येतात. ईश्वर सर्वांना समान लेखतो, ही भूमिका जनाबाईची महत्त्वपूर्ण आहे. तो प्रत्येक कामात मदत करतो. हे परमेश्वराच्या अलौकिकत्वाचे लौकिकीकरण असून, ईश्वर सर्वांचा आहे, ही भूमिका व्यक्त करताना त्या म्हणतात, "ऐसी कीर्तनाची गोडी। वैकुंठीहूनी घाली उडी ।।१।। आपण वैकुंठीचे नसे । भक्तापासी जाण वसे ।।२।।"[३] अशा स्वरूपात जनाबाईनी ईश्वरीय भूमिका लोकांपुढे ठेवण्यामागचा दृष्टिकोन हा ईश्वराचे सामान्यीकरण करणारा व तो आपल्यासारखा आहे, असा भाव निर्माण करणारा आहे. परमेश्वर आपल्यासारखा म्हणजे आपला असून, प्रचलित व्यवस्थेने नाकारलेले हक्कसुद्धा आपले आहेत, हा विचार रुजविणारा आहे. संत ज्ञानेश्वरांनी समाजपरिवर्तन घडवून आणण्यासाठी 'ज्ञानेश्वरी' सारख्या ग्रंथाबरोबरच अभंगरचनाही केली. सामान्य माणसांचा उद्धार त्यांना साधावयाचा होता. तत्कालीन समाज आत्मविश्वासशून्य आणि दिशाहीन होता. त्या समाजात विश्वास निर्माण करून दिशा देण्याचे काम ज्ञानेश्वरांनी केल्याचे दिसून येते. ज्ञान आणि धर्मविचारावर जी विकृत आवरणे चढली होती, ती दूर करून, समाजविकासाचा मार्ग मोकळा करून, समाजाला अनेक अंधश्रद्धा, अस्पृश्यता यांसारख्या वाईट रूढींतून सोडवण्याचे काम त्यांनी केले. हे करताना ते म्हणतात, "दुजेपणाचा भावो आम्हां नाहीं ठावो । सर्वी सर्व देवो आकारला ।।१।। कैसे याचें कारणे सांग आम्हां माय । कामधेनु होय कल्पनेची ।।२।।"[४] संतांना दुजेपणाचा भाव नको होता, हा विचार समाजात बदल घडवून इच्छिणारा आहे. "ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रातील संतचळवळीचे, धार्मिक प्रबोधनाचे आणि दलितोद्धाराचे आद्य प्रणेते होत. परमात्म्याला ब्राम्हणांपासून अंत्यजापर्यंत सर्व भक्त सारखेच प्रिय असतात. भक्ताला विद्वतेचे आवरण आणि वर्णाभिमान झुगारून देवापुढे उभे राहावे लागते. जातिसंस्थेतील उच्च-नीच भाव, अधिकारभेद, विषमता, संकुचितपणा इत्यादी दोष ज्ञानेश्वरांनाही दिसत होते.......... बाह्य विषमतेपेक्षा मना-मनांतील भेदभाव अधिक घातक आहेत, याची जाणीव होती."[५] मनातील भेदभाव दूर झाल्याशिवाय बाहेरील भेदभाव दूर करता येणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी आतून-बाहेरून बदल घडला पाहिजे, यासाठी प्रयत्न केले. त्यांचा हा दृष्टिकोन सुधारणावादी आहे.

संत गोरा कुंभार यांनी सुधारणावादी विचार मांडताना व्यक्तीच्या कर्माला अधिक महत्त्व दिले आहे. माणसाने जे काम हाती घेतले, त्यात जीव ओतला पाहिजे. प्रामाणिकपणा हा व्यक्तिगत व सामाजिक जीवनाला गती प्राप्त करून देणारा घटक आहे, हे सांगताना ते म्हणतात, "एकमेंका माजी भाव एकविध । असे एक बोध भेदरहित ।।१।। तूं मज ओळखी तू मज ओळखी । मी तुज देखत आत्मवस्तु ।।२।।"[६] समर्पणाशिवाय सुधारणा नाही. प्रत्येक व्यक्ती वेगळी असली तरी त्यातील भाव समान आहेत. तसा परमेश्वर प्रत्येकात असतो. त्यामुळे मी परमेश्वराच्या अधिक जवळ आहे, हा अहंकार दुःख वाढवील, जातीयता ऱ्हासाला कारणीभूत ठरेल, हा दृष्टिकोन सामाजिक सुधारणा घडवून आणणारा आहे.

संत नरहरी सोनार यांनी ही परंपरा पुढे नेत आपले विचार समाजापुढे आचरणातून ठेवले. आपण जे रुजवितो, तेच निर्माण होते. त्यामुळे व्यक्तीने मानवी कल्याणाकरिता चांगले विचार पेरले पाहिजेत, हे सांगताना ते म्हणतात, "ज्याचें बीज पेरियेले । त्यांचे त्यास फळ आलें ।।५।। ज्यानें जैसें आचरिले । तैसें त्याच्या फळा आलें ।।६।। मानवाचें कल्पना बळ । देव करितों सकळ ।।७।।"[७] विचारांची पेरणी व आचरण यांना अधिक महत्त्व देत, समाजहित व मानवी कल्याण यांचा विचार करून समाजाच्या विचारात बदल घडला पाहिजे, हा विचार सुधारणावादी आहे.

संत माणकोजी बोधला यांनी अविद्या, वाईट इच्छा सोडून आत्मविश्वास वाढवावा, हा विचार अभंगातून दिला आहे. त्यातून सामाजिक सुधारणा शक्य आहे, असे त्यांना वाटते. "ये माझ्या मंदिरा विठोबा उदारा । तोडूनिया थारा अविद्येचा ।।१।। कुवासना कुबुद्धि मुळीं हीन छेदी । अहंकारासी बंदी घालूनिया।।२।।"[८] ज्ञानाचे महत्त्व तत्कालीन समाजाला पटवून देणे, ही महत्त्वपूर्ण कामगिरी त्यांच्या अभंगातून दिसून येते. संत एकनाथांनी हा वारसा पुढे नेत एक पाऊल पुढे टाकले. तत्कालीन समाजाचे नैतिक अधःपतन

होऊन समाज रसातळाला गेला होता. मत्सर, दंभ, अहंकार, विषयवासना, या दुर्गुणांनी समाज बरबटला होता. अशा समाजाची नैतिकता उंचावून त्याला आत्मविश्वास देणे गरजेचे होते. म्हणून नाथ नैतिक मूल्यशिक्षण समाजाला देताना म्हणतात, "चिंतने नासतसे चिंता । चिंतने सर्व कार्य ते हातां । चिंतनें मोक्ष सायुज्यता घर शोधितसे ।।१।। ऐसे चिंतनाचें महिमान । तारिले अधम खळ जन। चिंतने समाधान । प्राणिमात्र होतसे।।२।।"[९] मानवी जीवनातील चिंतनाचे महत्त्व पटवून देताना त्यांनी चिंतनामुळे चिंता नाहीशी होते, असे म्हटले आहे. त्यांना याची जाणीव आहे की, सामान्य माणूस अनेक दु:खांत आहे; पण त्या समस्येवर तो उपाय न शोधता कर्मकांडाच्या मागे लागला आहे. अशा देवभोळेपणामुळे समस्या तर कमी होत नाही, उलट ती अधिक वाढते. शिवाय त्या काळात राजकीय अस्थिरता होती. त्यातही सामान्य माणूसच भरडला जात होता. इस्लामी आक्रमणाने तो भयग्रस्त झाला होता. त्यामुळे तो दर्ग्याची व पिराची पूजा करू लागला. त्याची अस्मिता लयाला गेली होती. त्यामुळे नाथ म्हणतात, "हरे भव भय व्यथा चिंतने । दूर पळती नाना विघ्नें । कली कल्मष बंधने । न बाधती चिंतनें ।।१।।"[१०] ही विघ्ने दूरे सारायची असतील, भय कमी करायचे असेल, तर चिंतन महत्त्वपूर्ण आहे, असे चिंतनाचे मानवी जीवनातील महत्त्व ते सांगतात. समाजाला धीर देताना, या व्यथांच्या मुळाशी अविद्या आहे, असे त्यांना वाटते. पण, ही अविद्या चिंतनाने दूर करता येते, हे सांगताना नाथ म्हणतात, "रात्रीची प्रौढी नोहे सूर्याचा प्रकाश । तोंवरीच भास अंधाराचा ।।१।। सूर्याचे उदयीं अंधार हा नासे । तैसें अज्ञानें नासे ज्ञान सर्व ।।२।।"[११] या ठिकाणी रात्र, सूर्य हे प्रतीकात्मक आहे. रात्र ही अविद्या आणि धार्मिक आक्रमणाच्या वाईट स्थितीचे चित्रण करणारी असून, ती स्थिती फार काळ टिकणारी नाही. कारण ज्ञानाच्या प्रकाशाने हे सर्व नाहीसे करता येते, हा विश्वास नाथ तत्कालीन समाजाला देऊ पाहतात. त्यामुळे समाज सावरेल, असा त्यांना विश्वास वाटतो.

संत तुकारामांच्या अभंगातून त्यांचा सुधारणावादी दृष्टिकोन जाणवतो. समाजातील सामान्य माणसाविषयीचा कळवळा, त्यांच्या उद्धाराची तळमळ जागोजागी दिसते. संत कोणाला म्हणावे, हे सांगताना ते म्हणतात, "जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ।।१।। तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ।।२।। मृदू सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचे चित्त ।।३।। ज्यासि आपंगिता नाही । त्यासि धरी जो ऱ्हदयीं ।।४।।"[१२] ज्याला गरिबाची दया आहे, जो आतून-बाहेरून कोमल आहे, ज्याचे चित्त सज्जन आहे आणि तो आधारहीन लोकांना ऱ्हदयाशी धरतो, त्याला साधू म्हणावे. संताची ही व्याख्या वेगळी असून, ती कालसुसंगत आहे. यात सुधारणावादी दृष्टिकोन दिसतो. तुकारामांना समाजातील प्रत्येक समस्येवर कायमस्वरूपी उपाय हवा आहे. सामाजिक समस्या ही मुळासकट उपटली पाहिजे. म्हणून ते म्हणतात, "पोटीं शूळ अंगी उटी चंदनाची। आवडी सुखची कोण तया ।।१।। तैसें मज कां गा केले पंढरीराया। लौकिक हा वायां वाढविला ।।२।।"[१३] पोटात त्रास आहे आणि वर शरीराला चंदन लावले, तर काय उपयोग? यातून त्यांना व्यक्तींच्या जीवनातील अनेक मूलभूत समस्या शिल्लक असताना त्यांना केवळ पारमार्थिक सुखाची कल्पना दाखविणे योग्य नसून, अगोदर त्यांची दु:खे निवारण केली पाहिजेत, असे ते म्हणतात. त्यांचा हा दृष्टिकोन सुधारणावादी आहे.

ज्ञानाचे महत्त्व समाजाला सांगताना तुकाराम अत्यंत समर्पक शब्दांत ते पटवून देतात. त्यांना याची जाणीव झाली की, ज्ञान हे जीवनात बदल घडवू शकते. म्हणून ते लोकांना धनाच्या पाठीमागे न लागता खरे धन म्हणजे ज्ञानाच्या मागे लागा, असे सांगताना म्हणतात, "आम्हा घरीं धन शंब्दाचींच रत्नें । शब्दांचींच शास्त्रे यत्न करूं।।१।। शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन । शब्दें वाटुं धन जनलोकां ।।२।। तुका म्हणे पहा शब्दचि हा देव । शब्देंचि गौरव पूजा करूं।।३।।"[१४] मनुष्याची योग्यता ही धनावरून ठरत नसून, ज्ञानावरून ठरते, हा विचार त्यांना रुजवायचा आहे. शिवाय धन कायम राहत नाही, ज्ञान कायम राहते. तेच आजच्या काळाचे शास्त्र आणि शस्त्र आहे. व्यवहारात आणि परमार्थात जगण्यासाठी विद्या हेच एकमेव साधन आहे. त्यामुळे सर्वांनी त्याचीच पूजा केली पाहिजे. विद्येचे महत्त्व या पलीकडे आजपर्यंत तरी तुकारामाशिवाय कोणी सांगितले नाही एवढे महत्त्व ते विद्येचे सांगतात. त्यामुळे त्यांच्या हा दृष्टिकोन सुधारणावादी आहे.

संत बहेणा यांच्या अभंगातही सुधारणावादी दृष्टिकोन दिसून येतो. त्यांच्यावर संत तुकारामांचा प्रभाव असल्यामुळे त्याही तुकारामांच्या दृष्टिकोनातून विचार करताना दिसतात. याविषयी शालिनी जावडेकर म्हणतात, "अध्यात्मविद्येच्या प्रातांत गुरूचे वा शिष्याचे वर्ण, आश्रम, वेष, वय, जात इत्यादी आड येऊ शकत नाही, हे त्यांनी आपल्या जीवनात स्वत:च्या आचरणाने सिद्ध केले. तुकारामांची परखड विचारसरणी, एकंदर वारकरी संतांचा पारमार्थिक समतावाद बहेणाबाईंर्च्या जीवनात व वाङ्मयात पूर्ण परिणत स्वरूपात दिसतो."[१५] त्यामुळे संत तुकाराम व बहेणाबाई यांच्या सुधारणावादी विचारांत समानता दिसून येते.

संत नामदेवापासून ते संत बहेणा पर्यंतच्या दीर्घ वारकरी परंपरेत समाजाकडे सुधारणावादी दृष्टिकोनातून संत पाहताना दिसतात.

Principal
Late Babasaheb Deshmukh Gorthekar Arts, Commerce ... Mahavidyalaya ... Nanded. [M.S.]
UMRI Pin-431807 Maharashtra